# ठोक जलप्रशुल्क प्रस्तावा (२०१७-१९) वर लाभार्थी, संबंधित विभागांचे तसेच जलसंपदा विभागाचे सूचना / अभिप्राय व प्राधिकरणाचा प्रतिसाद

जानेवारी २०१८

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY

MWRRA

DOMESTIC • AGRICULTURE • INDUSTRY

# प्रस्तावना

राज्यातील सिंचनासाठी पाणीपट्टीचे तसेच औद्योगिक व घरगुती पाणीपट्टीचे दर जलसंपदा विभागाचे शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१०/(४०७/१०)/सिंव्य (धोरण) दि. २९ जून २०११ नुसार निर्धारित केलेले होते. यानंतर या दरामध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही. यानंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने अधिनियमातील कलम ११ (घ) नुसार जून २०१४ मध्ये निर्धारित केलेल्या निकषानुसार पाणीपट्टी सुधारित करण्याचा दर प्रस्ताव शासनाकडून मार्च २०१७ मध्ये प्राप्त झाला. त्याची छाननी करुन प्राधिकरणाने जुलै २०१७ मध्ये तो शासनास लाभार्थीच्या सल्लामसलतीस्तव पाठविला होता. सदर प्रस्तावास जलसंपदा विभागामार्फत संकेतस्थळ व वृत्तपत्रामार्फत जाहीर प्रसिद्धी देण्यात आली होती. सदर मसुदा जिल्हा तसेच तालुका मुख्यालयात ही दि. ०१/०८/२०१७ ते ३१/०८/२०१७ या कालावधीत माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात आला होता. प्रस्तावावर दि. ३१/०८/२०१७ पर्यंत पाणी वापर संस्था, घरगुती पाणी वापरकर्ते, औद्योगिक पाणी वापरकर्ते, विभागासोबत करारबद्ध असलेले व्यक्तीगत ठोक वापरकर्ते व यापैकी कोणाच्याही हितसंबंधाशी अधिकृतपणे निगडित असलेल्या पंजिकृत अशासकीय संस्थाकडून प्रशुल्क प्रस्तावाबाबत अभिप्राय / सूचना मागविल्या होत्या.

सदर प्रस्तावास मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. परिशिष्ट १ मध्ये नमूद शासनाचे पाण्यासंबंधीचे विविध विभाग (जलसंपदा, उद्योग व उर्जा), क्षेत्रिय अधिकारी, जलतज्ञ, जलक्षेत्रात कार्यरत अशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, पाणी वापर संस्था इत्यादी १४८ व्यक्ती / अभिकरणाकडून सूचना / अभिप्राय प्राप्त झाले. प्राप्त अभिप्रायातील Duplication वगळून एकत्रित केलेले महत्वाचे अभिप्राय व त्यावरील प्राधिकरणाचा प्रतिसाद याबाबतचा तपशील सदर अहवालात अंतर्भूत करण्यात आला आहे.

प्राप्त सूचना व अभिप्राय यांचा सर्वंकष विचार करून जलप्रशुल्क प्रस्ताव अंतिम करण्यात आलेला आहे. प्रस्ताव अंतिम करतांना प्राप्त सूचना अभिप्रायांची प्राधिकरणास मोठी मदत झाली. याबाबत प्राधिकरण सर्वांचे आभारी आहे.

(डॉ. सुरेश कुलकर्णी)
सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY

MWRRA

DOMESTIC • AGRICULTURE • INDUSTRY

# ठोक जलप्रशुल्क प्रस्तावावरील प्राप्त अभिप्राय व प्राधिकरणाचा प्रतिसाद

## १. सामाईक अभिप्राय

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मसुदा संदर्भ</th><th>प्राप्त अभिप्राय</th><th>प्राधिकरणाचा प्रतिसाद</th></tr>
<tr><td>१.</td><td>परिच्छेद ४<br>पृ. ८</td><td>मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, महाराष्ट्र राज्य:<br>यांनी संकलित केलेली पुढील अद्ययावत आकडेवारी विचारात घेऊन पाणीपट्टी दरात आवश्यक बदल करण्याबाबत कळविले :
<table>
<tr><th>बाब</th><th>जून २०१६ अखेर निर्मित सिंचन क्षमता (लक्ष हेक्टर)</th><th>सन २०१६-१७ मधील सिंचित क्षेत्र ( लक्ष हेक्टर)</th></tr>
<tr><td>मोठे प्रकल्प</td><td>२५.७६७</td><td>२४.२७२</td></tr>
<tr><td>मध्यम प्रकल्प</td><td>८.९५६</td><td>६.१८०</td></tr>
<tr><td>लघु प्रकल्प</td><td>१४.८९४</td><td>९.०२१</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>४९.६१८</td><td>३९.४७३</td></tr>
</table></td><td>निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचनाची अद्ययावत आकडेवारी आता विचारात घेतली आहे. सिंचन प्रकारानुसार वापरात असलेली सिंचन क्षमता व निर्मित तथा वापरात नसलेली सिंचन क्षमतेसाठी तेराव्या वित्त आयोगाने सन २०१४-१५ साठी शिफारस केलेले मापदंड (आस्थापना खर्चासह) विचारात घेऊन व त्यावर प्रतिवर्षी १० टक्के भाववाढ विचारात घेऊन अंदाजित खर्चाची परिगणना केली आहे. यानुसार अंदाजित खर्च रु. १०१६.४५ कोटी इतका येतो. सदर अंदाजित खर्च आता जलदर प्रशुल्क परिगणनेसाठी विचारात घेतला आहे. (शासनाने दि. १८ मार्च २०१७ रोजी पाठविलेल्या प्रस्तावात सन २०१४-१५ अखेरची निर्मित सिंचन क्षमता (४८.६६ लक्ष हे.) व प्रत्यक्ष सिंचन (३१.३७ लक्ष हे) आकडेवारी दिली होती. त्याआधारे परिगणित केलेल्या प्रारूप मसुद्यातील अंदाजित खर्च रू ९११.४४ कोटी होता.)</td></tr>
<tr><td>२.</td><td>परि. ४<br>पृ.क्र. ८</td><td>जलसंपदा विभाग:<br>सन २०१७ ते २०१९ साठी जलशुल्क प्रस्तावाच्या प्रस्तावानेतील मुद्या क्र. ४ नुसार देखभाल दुरुस्ती व परिचालन खर्चाचा अंदाज यावरील मसुद्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.<br>i) शासनाने प्राधिकरणाकडे पाठविलेल्या प्रस्तावामध्ये सन २०१७-१८ साठी देखभाल-दुरुस्ती व वार्षिक परिचालन या प्रीत्यर्थ रु. १४०६.५३ कोटी इतका प्रस्तावित केला होता. तथापि तो महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी कमी करुन रु. ९११.४४ कोटी धरला आहे. अधिनियमातील तरतूदीनुसार "संपूर्ण खर्च परावर्तीत होणे अपेक्षित आहे”. पाणीपट्टी दर कमी झाल्याने वसुलीवर परिणाम</td><td>शासनाचे प्रस्तावानुसार २०१७-१८ साठीचा अंदाजित खर्च रु १४०६.५३ कोटी इतका आहे. याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.<br><br>आस्थापना खर्च -- रु ९९०.२७ कोटी<br>सिंचन प्रकल्पांचे देखभाल दुरुस्तीसाठी -- रु २१८.७६ कोटी<br>उपसा सिंचन योजनेचा वीज देयक<br>व विद्युत यांत्रिकी उपकरणाच्या<br>देखभाल- दुरुस्तीसाठी -- रु १९७.५० कोटी<br>एकूण रु १४०६.५३ कोटी</td></tr>
</table>

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | होणार आहे. सन २०१७-१८ मध्ये ४०% आस्थापना खर्च महामंडळाने शासनास परत करावयाचा आहे. पण नंतर दरवर्षी ६०%, ८०% व १००% प्रमाणे त्यात वाढ होणार आहे. असे असले तरी शासनाच्या खात्यातुन उर्वरीत खर्च होणारच आहे. देखभाल व दुरुस्तीच्या कामाची व पगाराची भाववाढीने किंमत वाढणार आहे. सबब पाणी पट्टीच्या वाढीचा दर व खर्चाच्या वाढीचा दर यात सुसंगती राहणार नाही पर्यायाने देखभाल-दुरुस्तीसाठी निधी शिल्लक राहणार नाही. याबाबत गांभीर्याने विचार व्हावा. | शासनाचे प्रस्तावानुसार आस्थापना खर्च ७०.४०% इतका आहे. तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार तो ४०% चे मर्यादित असणे गरजेचे आहे. सारांशाने आस्थापना खर्चात आमुलाग्र बचत करणे अभिप्रत आहे. शासन प्रस्तावात ५४१२ रिक्त पदे भरणे प्रस्तावित करून या बाबतची तरतुद अंदाजित खर्चात विचारात घेतलेली आहे. तथापि वित्त विभागाने दि. २ जून २०१५ च्या शा. नि. नुसार रिक्त पदे भरण्यावर मर्यादा घातल्या आहेत.<br><br>आस्थापना खर्चासह देखभाल-दुरुस्ती-परिरक्षणाचे मापदंड नसलेने आस्थापना खर्चावर नियंत्रण रहात नाही. त्यामुळे प्राधिकरणाने दि. २८ जुलै २०१७ च्या पत्रान्वये आकृतीबंध सुधारित करणेबाबत शासनास सुचविले होते. तसेच आस्थापना खर्चासह देखभाल-दुरूस्तीचे मापदंड (तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारसीच्या धर्तीवर) सुधारित करणेबाबत सुद्धा दि. २८ जुलै २०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणाने शासनास सूचित करून याबाबतची कार्यवाही ऑक्टोबर २०१७ पर्यंत पूर्ण करण्याबाबत कळविले होते. या सर्व बाबी विचारात घेऊन प्राधिकरणाने सिंचन प्रकारानुसार वापरात असलेली सिंचन क्षमता व निर्मित तथा वापरात नसलेली सिंचन क्षमता यासाठी १३ व्या वित्त आयोगाने सन २०१४-१५ साठी शिफारस केलेले (आस्थापना खर्चासह) मापदंड दर वर्षी १०% भाववाढ प्रारूप जलप्रशुल्क प्रस्ताव तयार करतांना विचारात घेऊन घेतले आहेत.<br><br>शासनाचे प्रस्तावात उपसा सिंचन योजनेच्या वीज देयकाची अंदाजित खर्चात कार्यान्वयित न झालेल्या १४ उपसा सिंचन योजनांच्या वीज देयकाची रक्कम विचारात घेतली होती. ती प्राधिकरणाने वगळली आहे.<br><br>त्याचप्रमाणे शासनाचे प्रस्तावात अंदाजित खर्चात उपसा सिंचन योजनेच्या यांत्रिकी व विद्युत उपकरणांच्या देखभाल- दुरुस्तीसाठी कोणत्याही मापंडाचा अवलंब न करता adhoc तरतुदी प्रस्तावित केल्या होत्या. काही उपसा सिंचन योजनांच्या देखभाल-दुरूस्ती खर्चात विशेष दुरूस्ती खर्चाचाही समावेश आढळल्याने |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | | प्राधिकरणाने उपलब्ध आकडेवारी वरुन मापदंड निश्चित करुन त्या आधारे खर्चाची परिगणना केली आहे.<br><br>शासनाने दिनांक १८ मार्च २०१७ च्या प्रस्तावात निर्मित सिंचन क्षमता (२०१४ - १५) व प्रत्यक्ष सिंचन याबाबतचा जो तपशील दिला होता त्याआधारे खर्चाची परिगणना प्रारूप मसुदा तयार करताना केली आहे. मात्र आता महाराष्ट्र जलसंपत्ती विकास केंद्र, औरंगाबाद यांचे कडून सन २०१६-१७ ची आकडेवारी प्राप्त झाल्याने त्याआधारे अंदाजित खर्चाची परिगणना सुधारित केली आहे. (रु. १,०१६.४५ कोटी) व त्याआधारे पाणीपट्टीचे दर अंतिम केलेले आहेत.<br><br>शासनाने सिंचन विषयक आस्थापना खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. राज्यातील विविध सिंचन प्रकार जसे (मोठे प्रकल्प, मध्यम प्रकल्प, लघु प्रकल्प, को. प. बंधारे, बॅरेज, उपसा सिंचन योजना) यासाठी आस्थापना खर्चासह देखभाल-दुरूस्ती चे निकष ठरवावेत. सिंचन हंगामात जास्त आस्थापना लागते. त्यामुळे रिक्त पदे कायम स्वरुपी भरण्याऐवजी हंगामी कर्मचारी कंत्राटी पध्दतीने नेमण्याचा विचार व्हावा. तसेच महसूल ( Revenue Base) वाढविणे गरजेचे आहे. |
| ३. | परि. ४<br>पृ.क्र. ८ | महामंडळाचे मालमत्तेची किंमत १.२५ ते १.५० लक्ष कोटी एवढी आहे. या मालमत्तेच्या परिरक्षणासाठी १ टक्के नुसार वार्षिक १५०० कोटी इतका देखभाल दुरुस्तीसाठी निधी मिळावा.<br><br>गुंतवणुकीच्या १ टक्के निधी देखभाल - दुरुस्तीसाठी शासनाने मंजूर करणे अगत्याचे आहे.<br><br>महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम ११ (घ) नुसार प्रकल्पावरील वार्षिक परिचालन व परिरक्षण ( देखभाल-दुरुस्ती ) च्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल असे पाणी पट्टीचे दर निश्चित करावयाचे आहेत. मात्र देखभाल-दुरुस्तीसाठी आवश्यक निधी शासनाकडून दिला जात नाही. प्रत्यक्ष खर्चावर आधारित पाणीपट्टी निश्चित होत असल्याने पाणीपट्टी दर कमी होऊन | केवळ भांडवली गुंतवणुकीचे आधारे परिरक्षण दुरुस्तीचा खर्च परिगणित करणे उचित होणार नाही. सिंचन पध्दतीनुसार वापरातील सिंचन क्षमता व वापरात नसलेल्या सिंचन क्षमतेवर आधारित प्रति हेक्टरी आस्थापना खर्चासह देखभाल-दुरूस्ती खर्चाचे निकष असणे गरजेचे आहे. असे अद्यावत निकष राज्यात अस्तित्वात नाहीत. त्यामुळे प्राधिकरणाने १३ व्या वित्त आयोगाने सन २०१४-१५ साठी शिफारस केलेले मापदंड प्रतिवर्षी १० टक्के दरवाढीसह अद्यावत करुन त्याआधारे आस्थापनेसह अनुज्ञेय परिरक्षण - दुरुस्ती खर्चाची परिगणना केलेली आहे. |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | आवश्यक त्या देखभाल-दुरुस्ती निधीची वसुलीही होत नाही. | |
| ४. | परि. ४ पृ.क्र. ८ | परि. ४ नुसार शासनाच्या प्रस्त्वानुसार रु. १४०६ कोटी वार्षिक महसूल अपेक्षित आहे. मात्र MWRRA ने फक्त ९११ कोटी रुपये अनुज्ञेय केला आहे. राज्यातील सर्व प्रकल्प व उपसा सिंचन योजनेच्या दे.दु./ व्यवस्थापनासाठी कामाप्रित्यर्थ किमान रुपये ४१६ कोटी निधी अपेक्षित आहे. याचा अर्थ प्रस्तावित दरानुसार येणाऱ्या महसूलातून कामासाठी ४१६ कोटी द्यावयाचे झाल्यास आस्थापना खर्चात माठी कपात अपेक्षित आहे.<br><br>सध्याची सिंचन व्यवस्थापन आस्थापना क्षेत्रफळाधारीत आकारणी विचारात घेऊन निर्धारित आहे. भविष्यात १०० टक्के घनमापन पुरवठा विचारात घेतल्यास आस्थापनेमध्ये गरजेनुसार कपात करणे शक्य आहे. ती लवकर करावी. अन्यथा देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी निधी उपलब्ध होणार नाही व प्रकल्पाची कार्यक्षमता कमी कमी होत जाईल. | आस्थापनेवरील खर्च नियंत्रित करणे आवश्यक आहे. आस्थापना खर्चासह सिंचनाचे मापदंड निश्चित करणे गरजेचे आहे. |
| ५. | नव्याने प्रस्तावित | शासनास द्यावयाच्या आस्थापना खर्चाचा परतावा विचारात घेण्यात यावा | जलसंपदा विभागाचे दि. १७ नोव्हेंबर २०१६ चे शा. नि. नुसार सन २०१७-१८ मध्ये शासनास आस्थापना खर्चाचा परतावा महामंडळास करावा लागणार आहे, त्याचा विचार केलेला आहे. |
| ६. | परिशिष्ट १, २ व ३ | उपरोक्त दर प्रस्तावामध्ये परिमाणाचे एकक सर्वत्र एकच ठेवण्यात यावे. उदा. पैसे/घमी | शेतीसाठी परिमाण पैसे/घमी व घरगुती व औद्योगीकसाठी रु/घमी असे घेण्यात आले आहे. |
| ७. | परिशिष्ट १, २ व ३ | दर्शविण्यात आलेले सर्व आकडे शतांशा (Two decimals) पर्यंतच घेण्यात यावे. (उदा. १.३२) | स्विकृत त्यानुसार आदेशात सुधारणा करणेत येत आहेत. |
| ८. | परिशिष्ट १, २ व ३ | जलदरात सवलती देणे हे मजनिप्राचे काम नाही. मजनिप्रा व जसंविच्या भुमिकांची गल्लत होऊ नये. | सूचना स्विकारार्ह. त्यानुसार फेरविचार करून आदेशात या टप्प्यावर सुधारणा करणे शक्य आहे त्या सुधारणा केल्या आहेत. |

## २. सिंचन विषयक अभिप्राय

| अ. क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| ९. | परि. १.५<br>पृ.क्र. २ | वैयक्तिक लाभधारकाकरिता प्रवाही पध्दतीने पाणीपुरवठा करण्यांत येत असतांना पाण्याचे मोजमाप घनमीटर पध्दतीने करणे अवघड आहे. यास्तव पुर्वीप्रमाणे प्रवाही पध्दतीने सिंचनासाठी पाणी देताना प्रतिहेक्टर दर निश्चिती करुन आकारणी करणे योग्य होईल. | सध्या प्रवाही सिंचन पध्दतीमध्ये होणारा पाणी वापर व पाणीनाश नियंत्रित करण्यासाठी सिंचनासाठीचा संपूर्ण पाणीपुरवठा व पाणीपट्टी आकारणी घनमापन पध्दतीने करण्याचा प्रस्ताव शासनाने दिला आहे. दि. ३० मे २०१७ रोजी प्राधिकरण कार्यालयात ठोक जल प्रशुल्क प्रस्तावाबाबत झालेल्या बैठकीत प्रधान सचिव (लाक्षेवि) यांनी पाणी वापर संस्थासाठी तसेच जेथे अशा संस्था गठित झालेल्या नाहीत तेथील वैयक्तिक लाभधारकांना घनमापन पद्धतीनेच यापुढे पाणी मोजून दिले जाईल असे स्पष्ट केले आहे.  सबब क्षेत्राधारित दराचे प्रयोजन नाही. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठीची आवश्यक सिद्धता विभागाकडून सुरू झालेली आहे असे प्राधिकरणाच्या निदर्शनास आणले आहे. आवश्यकतेनुसार शासनाने याबाबतच्या अंमलबजावणीसाठी अधिक स्पष्ट सूचना देणे अभिप्रेत आहे.<br><br>महाराष्ट्र राज्य जलनीती २००३ परि. ४.४ मध्ये घनमापन पध्दतीने पाणी पुरवठा व पाण्याची शुल्क आकारणीची तरतूद आहे. मजनिप्रा अधिनियम २००५ नुसार पाण्याच्या हकदारीचे वाटप, नियंत्रण व हस्तांतरण इ.साठी घनमापन पध्दतीचा स्वीकार करणे अनिवार्य आहे. १४ व्या वित्त आयोगानेही शेतीसाठी घनमापन पद्धतीने पाणीपुरवठा करणेची शिफारस केली आहे.<br><br>संक्रमण काळात प्रकल्पावर/ कालव्यावर /शाखेवर/वितरिकेवर पडलेल्या ड्युटीचे आधारे परिगणना करणे शक्य आहे. |
| १०. | परि. १.५<br>पृ.क्र. २-३ | खाजगी उपसा सिंचन योजनांचे लाभधारकांचे प्रमाण जास्त असल्याने सदर लाभधारकांना करण्यांत येणारा पाणीपुरवठा घनमापन पध्दतीने मोजणे अवघड आहे.<br>(१) खाजगी उपसा सिंचनाचे घनमापन पध्दतीने मोजमाप करावयाचे झाल्यास मोजमाप यंत्र बसविणेकरिता लाभरधारकांना कमीत कमी १ वर्षाचा कालावधी | खाजगी उपसा सिंचन योजनेबाबत पंपगृह, पंप, पाईपलाईन, मिटर या पायाभूत गुंतवणुकी विचारात घेऊन पाणीपट्टीत ३५ टक्के सूट दिली आहे.  त्यामुळे खाजगी उपसा सिंचन लाभधारकांनी मीटर बसविणे आवश्यक आहे.<br>संक्रमण कालावधीत मीटर बसवेपर्यंत आकारणी पंपाचे आधारे किंवा प्रमाणित ड्युटीव्दारे करावी.  मीटर बसविण्यासाठी एक वर्षाचा कालावधी दिला आहे. |

| अ. क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | देणे आवश्यक आहे.<br>(२) घनमापन पध्दतीने मोजमाप करणेकरिता व तपासणीकरिता सिंचन व्यवस्थापनाकरिताचा कर्मचारी वर्ग अपुरा आहे. तसेच मीटर बंद पडल्यास किंवा त्यात काही फेरफार केल्यास याबाबतीत नियंत्रण ठेवणे क्षेत्रीय दृष्ट्या दुष्कर आहे.<br>(३) घनमापन पध्दतीने मोजमाप करावयाचे झाल्यास पाणीवापर मोजमाप यंत्र बसविणे खर्चिक होईल व त्यामुळे लाभधारकांमध्ये असंतोष निर्माण होईल.<br>त्यामुळे पुर्वीप्रमाणे खाजगी उपसा सिंचनासाठी पाणी देतांना प्रतिहेक्टर दर निश्चिती सुध्दा ठेवण्यांत यावी. | |
| ११. | परि. १.५ पृ.क्र. २ | घनमापन पध्दतीसाठी आवश्यक ती पूर्वतयारी जोपर्यंत होत नाही तोपर्यंत पाणी पाळीप्रमाणे पाणीपट्टी आकारावी. एका पाणी पाळीचा हंगामनिहाय दर निश्चित करावा. एकूण हंगामातील आकारणी पाणी पाळयांच्या संख्येनुसार ठरेल असे करावे. | संक्रमण कालावधीत हंगाम निहाय, पाळीनिहाय प्रकल्पावर/ कालव्यावर / शाखेवर /वितरिकेवर पडलेल्या ड्युटीच्या आधारे घनमापन पध्दतीने आकारणी करणे शक्य आहे. |
| १२. | परि. १.५ पृ.क्र. २ | ज्या क्षेत्रावर पाणीवापर संस्था स्थापन झालेल्या नाहीत अशा क्षेत्रासाठी पिकनिहाय, हंगामनिहाय, हेक्टर बेसीसवर दर असावेत | ज्या क्षेत्रावर पाणी वापर संस्था नाहीत व जेथे पाणी मोजून देण्याची व्यवस्था नाही अशा क्षेत्रावर संक्रमण कालावधीसाठीची कार्यपध्दती प्राधिकरणाचे आदेशातील परिच्छेद ९ मध्ये सविस्तरपणे दिलेली आहेत. |
| १३. | नव्याने प्रस्तावित | सध्याच्या प्रचलित नियमानुसार कालव्यातील पाणी विहिरीत घेणे किंवा साठवून ठेवणे यावर बंधन आहेत. त्याऐवजी खालीलप्रमाणे तरतूद करावी.<br>"जर जलग्रहण बिंदू (intake point) ला पाणी प्रत्यक्ष मोजून घेतले असल्यास सदर पाणी विहिरीत/साठवण तलाव/ शेततळे तसेच हौदामध्ये घेता येईल. अशा प्रकाराच्या पाण्याचा (ठिंबक/तुषार सुक्ष्म सिंचनासाठी तसेच अन्य प्रकारे शेतीसाठी वापर करता येईल." | आदेशात या नुसार परिशिष्ट १, परिच्छेद २.३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. |
| १४. | नव्याने प्रस्तावित | शासन निर्णय दि. २ मे २०१७ नुसार सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात कालव्यातील पाणी नैसर्गिक नाल्यात सोडून पूरक वितरण व्यवस्था करण्याचे धोरण मंजूर केले | सुचनेचा विचार करुन आवश्यक तरतूद परिशिष्ट १, परिच्छेद ७.१ मध्ये करणेत आली आहे. |

| अ. क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | आहे. त्यानुसार (अ) - प्रवाही कालव्याव्दारे (ब) - शासकीय उपसा सिंचनाव्दारे, (क) - (अ) अधिक (ब) व्दारे नैसर्गिक नाल्यात पाणी सोडून खाजगी उपसा सिंचनव्दारे पाणी वापरकर्त्यांसाठी पाणीपट्टीचे दर जल प्रशुल्क प्रस्ताव २०१७-१९ मध्ये अंतर्भूत नाहीत. | |
| १५. | नव्याने प्रस्तावित | सुक्ष्म सिंचनासाठी शेतात पाणी साठविण्यासाठी कालव्यापासून विहिर/ शेततळयापर्यंत पाईप लाईन शेतकऱ्यांनी टाकावी. उघडया पाटाद्वारे विहिरीत पाणी भरुन घेतल्यास १० टक्के व्यय आकारला जाईल. | स्विकारार्ह. आवश्यक तरतूद प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट १, परिच्छेद २.३ मध्ये करण्यात आली आहे. |
| १६. | अ-३, अ-६ पृ.क्र. १२ | प्रकल्पग्रस्त वापरकर्त्यांना आदिवासी प्रमाणेच १० टक्के प्रमाणे नाममात्र दर आकारणी करावी. | प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट १, परिच्छेद ८.२ नुसार लाभक्षेत्रात पर्यायी जमीन दिलेल्या प्रकल्पग्रस्तांना २५ टक्के सवलत आहे. तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी जलाशयावरुन स्वखर्चाने उपसा सिंचन योजना राबविल्यास ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. |
| १७. | अ १ ते अ ७, अ ९ पृ.क्र. १२ -१३ | **सिंचन पाणीपट्टीतील सवलती / प्रोत्साहने / दंडनीय तरतुदी**<br>कृषि सिंचनाचे दर मूलत:च कमी आहेत. विविध सवलती दिल्याने क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना देयके तयार करताना क्लिष्ठता येते. तसेच वैविध्य, स्वेच्छाधिकार व अपुरी माहिती यामुळे सूसुत्रता व पारदर्शकता रहात नाही. सबब, अ १ ते अ ७, अ ९ मधील सवलतीच्या तरतूदी रद्द करण्यात याव्यात. | शेतीसाठी केलेल्या पाणी पुरवठयापोटी निकषानुसार एकूण खर्चाच्या १९ टक्के रक्कम वसूल होईल अशारितीने सिंचनाचे दर ठरतात. त्यामुळे ज्यावेळी सूट दर्शविली जाते त्यावेळी मूळ दर त्याप्रमाणात वाढविणे भाग ठरते. पुनर्विलोकन करुन अ-१, अ-२, अ-४, अ-७ मधील सवलतींच्या तरतुदी वगळण्यात आल्या आहेत. |
| | अ ८ पृ.क्र. १२ -१३ | मजकूर खालीलप्रमाणे ठेवावा -- सिंचन आवर्तन लांबले तरी ज्या हंगामाचे आवर्तन असेल त्याच हंगामाचा दर लागू होईल. खरीप पिकांसाठी रब्बीत व रब्बी पिकांसाठी उन्हाळयात पाणी दयावे लागले तरी मूळ हंगामाचे दर लागू होतील. | स्विकृत. याबाबत आदेशातील परिशिष्ट १ परिच्छेद ८.२ मध्ये स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. |
| | अ-१० | सवलत अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यास सहमती आहे. क्षेत्र हस्तांतरण करुन घेतलेल्या पाणी वापर संस्थेलाच लागू राहील. | शासनाने विहीरींवरील आकारणी रद्द केल्याने ही तरतूद वगळण्यात आली आहे. |
| | अ-११ | विहिरींवरील आकारणीची तरतूद, घनमापन पध्दतीने पाणी पुरवठा होणार | सदर तरतूद आता शासनाचे प्रचलित धोरणानुसार वगळण्यात आली आहे. |

| अ. क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | असल्याने हे कायद्याच्या तरतूदीशी विसंगत आहे.लाभक्षेत्रातील विहिरींवर पाणीपट्टी आकारणी करु नये. | |
| १८. | नव्याने प्रस्तावित | प्रकल्पावरील प्रथम वर्षीच्या सिंचनाबाबतची प्रायोगिक तत्त्वावरील वरीलप्रमाणे कार्यपध्दती लक्षात घेता, सदर जल प्रशुल्क दरात याबाबत १०० टक्के सुटीची तरतूद असणे आवश्यक आहे. | सूचना स्विकारार्ह. आदेशात परिशिष्ट १, परिच्छेद ९.१ मध्ये आवश्यक तरतूद करण्यात येत आहे. |
| १९. | क १ व २ पृ.क्र. १२ | शासकीय उपसा सिंचन योजना पाणीपट्टी दर ठरविण्याची मुभा महामंडळास द्यावी. पंप व विद्युत उपकरणे दुरुस्ती, वीज बीलासाठी वेगळे अनुदान दयावे. | शासकीय उपसा सिंचन योजनेवरील प्रवाही सिंचनाचे दर ठरविण्याची कार्यपध्दती प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट १ मधील परिच्छेद ५ मध्ये सविस्तरपणे दिलेली आहेत. |
| २०. | नव्याने प्रस्तावित | उपसा सिंचन योजनेच्या प्रस्तावित खर्चाच्या १०० टक्के निधी वर्षाच्या सुरुवातीस प्रकल्पनिहाय देणे आवश्यक. | पाणीपट्टी दर निश्चितीशी संबंधित नाही. प्राधिकरणाचे कक्षेतील बाब नाही. महामंडळ योग्य तो निर्णय घेऊ शकते. |
| २१. | क १ व २ पृ.क्र. १२ | शासकीय उपसा सिंचन योजनेसह सर्व प्रकारचा देखभाल दुरुस्तीचा खर्च, परिचालनाचा खर्च एकत्र करुन महाराष्ट्रात सर्वांना समान पध्दतीने विभागून समान पट्टी म्हणून लागू करावा. म्हणून सध्याचा १९ टक्के बोझा सर्वांवर टाकावा. | उपभोक्त्यांशी सल्लामसलत करुन जून २०१४ मध्ये अंतिम केलेल्या निकषानुसार ही तरतूद आहे. उपसा करावयाचे पाण्याचे मूल्य जास्त असल्याने त्याचा काटेकोरपणे वापर होणे गरजेचे आहे. ही जाणीव उपसा सिंचन योजनेच्या शेतकऱ्यांमध्ये रहावी ही या मागची विचारधारा आहे. यावर्षी शासकीय उपसा सिंचन योजनेच्या देखभाल-दुरुस्ती व वीज खर्चाचा ८१ टक्के भार सर्व वापरकर्त्यांवर टाकल्यामुळे शासकीय उपसा सिंचन योजनेवरील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शासकीय उपसा सिंचन योजनेच्या पाणीपट्टीचे दर ठरविण्याची कार्यपध्दती प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट १, परिच्छेद ५ मध्ये दिलेली आहे. |
| २२. | क १ व २ पृ.क्र. १२ | **क) शासकीय उपसा सिंचन योजनांसाठी पाण्याचे दर** टिप मधील"दरम्यानच्या काळात मोजमाप यंत्रे नसलेल्या प्रकरणी प्रमाणित डयूटी व सिंचन क्षेत्रानुसार घनमापन पध्दतीने आकारणी करण्यात यावी." याबाबत प्रमाणित डयुटी व कार्यपध्दती निश्चित करणे आवश्यक आहे. | याबाबत प्राधिकरणाचे आदेशातील परिच्छेद ९ मध्ये सूचना देण्यात आल्या आहेत. संक्रमण कालावधीत पाणी मोजमाप यंत्रे बसवेपर्यंत प्रकल्प/कालवा/शाखेवरील पडलेली ड्युटी (हेक्टर/दलघमी) व सिंचन क्षेत्रानुसार घनमापन पध्दतीने आकारणी करण्यात यावी. |
| २३. | परि. २.१ (अ) व (ब) | प्रवाही कालव्याच्या पाणीपट्टी दरामध्ये शीर्ष कामासंबंधीत (धरणाच्या) परिरक्षण व दुरुस्ती तसेच आस्थापना खर्चाचा समावेश होतो. त्यामुळे परिछेद २.१ (क) मध्ये | अंतिम निकषातील परिच्छेद-२, व्याख्यामध्ये Operation and maintenance cost चे व्याख्येत Intake, Pump house, pipe line energy charges यांचा समावेश |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मसुदा संदर्भ</th><th>प्राप्त अभिप्राय</th><th>मजनिप्राचा प्रतिसाद</th></tr>
<tr><td></td><td>पृ.क्र. २, ३</td><td>नमूद शासकीय उपसा सिंचन प्रकल्पांचा शीर्ष कामाच्या म्हणजे पंपगृह, पंप, उर्ध्वगामी नलिका व अनुषंगिक यंत्रसामग्री व उपकरणे यांचेवरील देखभाल-दुरुस्ती व आस्थापना खर्च परत अधिक करण्याची आवश्यकता नाही. म्हणजेच शासकीय उपसा सिंचन योजनांसाठी प्रकल्पनिहाय पाणीपट्टीचा दर हा प्रवाही कालव्याच्या पाणी पट्टीचा दर (राज्यस्तरीय) अधिक फक्त प्रकल्पनिहाय वीज देयकाच्या खर्चाच्या १९ टक्के इतका असावा. हेच तत्व प्राधिकरणाच्या निकषातील परिशिष्ट ४ मध्ये दिले आहे. महाराष्ट्रामध्ये उपसा सिंचन योजना अवर्षणप्रवण व सिंचनाच्या सुविधा नसलेल्या क्षेत्रामध्ये कार्यान्वित असल्याने त्या सुरु राहण्यासाठी सिंचन पाणीपट्टीचे दर परवडण्याची क्षमता विचारात घेऊन माफक असावेत. त्यानुसार आवश्यक बदल परिशिष्ट-१ मधील अ.क्र. (१) क (२) मध्ये आवश्यक वाटतो.</td><td>आहे. तसेच बहुतांशी उपसा सिंचन योजनांचे स्रोत नदी किंवा धरणाचे जलाशय आहेत. ज्या प्रकरणी नदी स्रोत आहे, अशा प्रकरणी नदीतील पाण्याचा प्रवाह वरील धरणातून सोडलेल्या नियंत्रित पाण्यावर असलंबून असतो. त्यामुळे प्रस्तावित तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट १ मधील परिच्छेद ५ मध्ये याबाबतची कार्यपध्दती दिली आहे</td></tr>
<tr><td>२४.</td><td>परिशिष्ट १<br>पृ.क्र. ११</td><td>
<table>
<tr><th colspan="4">२)ब) खाजगी उपसा सिंचन योजनांसाठी पाण्याचे घनमापन दर</th></tr>
<tr><th>अ. क्र.</th><th>वर्गवारी</th><th>पाणीपुरवठा स्रोत</th><th>सुधारित दर (पैसे प्रति घमी)</th></tr>
<tr><td>१</td><td rowspan="2">आश्वासित पाणी पुरवठा</td><td>मोठ्या प्रकल्पांचे जलाशय</td><td>बदल नाही</td></tr>
<tr><td>२</td><td>मध्यम प्रकल्पांचे जलाशय, मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे कालवे, साठवण तलाव</td><td rowspan="2">वर्गवारी २ व ३ चे दर हे वर्गवारी २ एवढेच ठेवण्यात यावेत. यामध्ये कोणताही फरक ठेवू नये व त्याचे दर अनु. क्र.१ च्या ८० टक्के असावेत.</td></tr>
<tr><td>३</td><td>वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा</td><td>धरणाच्या खालच्या बाजूचा नियंत्रित भाग / जलाशयाचा आधार असलेले को. प. बंधारे / जलविद्युत केंद्राचे अवजल</td></tr>
<tr><td>४</td><td>अंशतः आश्वासित पाणी पुरवठा</td><td>लघु प्रकल्पांचे कालवे, जलशयाचा आधार</td><td>अनु.क्र.४ चे दर हे अनु.क्र.१ च्या ६०</td></tr>
</table>
</td><td>वर्गवारी २ व ३ चे दर हे वर्गवारी २ एवढे ठेवण्यात आले आहेत.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मसुदा संदर्भ</th><th>प्राप्त अभिप्राय</th><th>मजनिप्राचा प्रतिसाद</th></tr>
<tr><td></td><td></td><td><table>
<tr><td></td><td></td><td>नसलेले को. प. बंधारे जलाशय इ.</td><td>टक्के असावेत.</td></tr>
<tr><td>५</td><td>किमान ८ महिन्यांच्या पाणी वापराच्या क्षमते इतका स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असलेला</td><td>पाणी वापरकर्त्या संस्थेने स्वखर्चाने बांधलेला बंधारा</td><td>अनु.क्र. ५ चे दर हे अनु.क्र. १ च्या २५ टक्के असावेत.</td></tr>
</table></td><td></td></tr>
<tr><td>२५.</td><td>परिशिष्ट १ पृ.क्र. ११</td><td>खाजगी उपसा सिंचना योजना, आश्वासित पाणी स्त्रोत, मोठे व मध्यम प्रकल्पासाठीचे दर एकच असावेत.</td><td>निकष ठरविताना मध्यम प्रकल्पासाठी दर निश्चित करुन मोठया प्रकल्पावर जास्त आश्वासित स्त्रोत असल्याने १.१५ पट दर ठेवले होते व ही धारणा योग्य आहे.</td></tr>
<tr><td>२६.</td><td>परिशिष्ट १ पृ.क्र. ११</td><td>नदी/बंधारे/जलशयातून पाणी वापरणा-या शेतक-यांनी पंपाना स्वखर्चाने मीटर बसवावेत व ते प्रमाणीत करावेत. त्यासाठी येणा-या खर्चाची वजावट पाणीपट्टी देयकातून दिली जाईल. मीटरची किंमत, Make व ठिकाण जलसंपदा विभागातून मंजूर केलेले असावे.</td><td>खाजगी उपसा सिंचन योजनेबाबत शेतक-यांनी/संस्थांनी पायाभूत सुविधांवर केलेली गुंतवणूक विचारात घेऊन पाणीपट्टी सवलत ( ३५ टक्के) दिली आहे. त्यामुळे मिटर खर्चाचा परतावा देण्याची आवश्यकता नाही.</td></tr>
<tr><td>२७.</td><td>परिशिष्ट १ पृ.क्र. ११</td><td>खाजगी उपसा सिंचन योजनेसाठी पाण्याचे घनमापनाचे दर या तक्त्यामध्ये अ.क्र.३ वर वहनव्ययासह नियंत्रित पाणीपुरवठासाठीचे दर आश्वासित पाणीपुरवठयाच्या दरापेक्षा कमी आहेत परंतू धरणाच्या खालील बाजुस सिंचनासाठी पाणी सोडतांना पाण्याचा वहनव्ययामुळे पाणी नाश होतो तसेच पाण्याची चोरी व अतिरिक्त बाष्पीभवन यामुळे पाण्याचा वापर प्रतिहेक्टर जास्त होतो. त्यामुळे हे दर आश्वासित पाणी पुरवठयापेक्षा जादाचे असावेत.</td><td>सूचना विचारात घेऊन आवश्यक सुधारणा प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट १, तक्ता-२ मध्ये केलेल्या आहेत.</td></tr>
<tr><td>२८.</td><td>परि. २.२ अ पृ.क्र. ३</td><td>कालव्याव्दारे पाणी पुरवठा केल्यानंतर त्यावरील पाणी वापर संस्थांना देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापन खर्चाकरिता मूळ दरामध्ये २५ टक्के सवलत जाहीर केली आहे. परंतु सहकारी पाणी पुरवठा संस्थांना जादा वीज बील, मशिनरी दुरुस्ती, देखभाल दुरुस्ती खर्च करावा लागतो. या सर्व बाबींचा विचार करुन सहकारी</td><td>उपभोक्त्यांची मते जाणून घेऊन जून २०१४ मध्ये अंतिम केलेल्या निकषानुसार खाजगी उपसा सिंचन योजनेच्या धारकास त्याने केलेली गुंतवणूक विचारात घेऊन प्रवाही सिंचन पाणीपट्टीच्या तुलनेत ३५ टक्के सवलत विचारात घेऊन तक्ता २ मधील दरनिश्चित केलेले आहेत. नोंदणीकृत पाणीवापर संस्थेने घनमापन पध्दतीने</td></tr>
</table>

| अ. क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | पाणीपुरवठा संस्थांना मूळ दराच्या ३५ टक्के आकारणी करुन ६५ टक्के सूट देण्याबाबत संस्थांच्या वतीने मागणी करीत आहे. | मोजून पाणी घेतल्यास सदर तरतुदीत आणखी २५ टक्के सवलत अनुज्ञेय आहे. याबाबतची तरतूद प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट-१, परिच्छेद ४.२ मध्ये करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त नोंदणीकृत खाजगी उपसा सिंचन योजनेव्दारे पाणी उचलून सूक्ष्म सिंचन केल्यास आदेशातील परिशिष्ट-१, परिच्छेद ९.२ नुसार २५ टक्के सवलत अनुज्ञेय आहे. म्हणजेच नोंदणीकृत खाजगी उपसा सिंचन योजनेव्दारे सूक्ष्म सिंचन केल्यास प्रवाही सिंचनाचे तुलनेत ३६ टक्के (०.६५ x ०.७५ x ०.७५ ) दर लागू होतात. मात्र नोंदणीकृत संस्थेने प्रवाही सिंचन केल्यास प्रवाही कालव्याचे तुलनेत ४८ टक्के दर लागू होतात. |
| २९. | परिशिष्ट १ ब-१) पृ.क्र. १३ | सहकारी पाणी पुरवठा संस्थांनी ठिबक सिंचन करावयाचे झाल्यास आपण मूळ दराच्या २५ टक्के सवलत देण्याचे जाहीर केले. परंतु सदरची सवलत ५० टक्के असणे गरजेचे आहे. | आदेशातील परिशिष्ट-१, तक्ता-१ मध्ये सहकारी पाणीवापर संस्थेसाठीची पाणीपट्टीचे दर वैयक्तिक लाभधारकाचे दरामध्ये २५ टक्के सवलत देऊन निश्चित केलेले आहेत. पाणीवापर संस्थेने पाणी घनमापन पध्दतीने मोजून ठिबक योजना राबविल्यास त्या दरातही प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट-१, पारिच्छेद ९.२ नुसार २५ टक्के सवलत अनुज्ञेय आहे. या दोन्ही सवलती स्वतंत्ररित्या लागू आहेत. |
| ३०. | परि. २.९ पृ.क्र. ४ | पाणीवापर कर्त्यांनी ८ महिन्याचा जलाशय निर्माण केल्यास ८४ टक्के दर सवलत आहे. ही तरतूद कृषीच्या पाणी पुरविण्यासाठीही लागू करावी. अन्यथा त्याचा फेरविचार करावा. | याबाबतची सिंचनासाठी तरतूद प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट १, तक्ता-२, अ.क्र. ५ मध्ये केलेली आहे. |
| ३१. | परिशिष्ट १ पृ.क्र. १३ ब-१ | सिंचनाच्या आधुनिक पध्दतीचा (सूक्ष्मसिंचन) अवलंब केला असेल तर अनुज्ञेय ७५ टक्के दर आकाराला जाईल.(तरतूद)<br>-- मीटर लावून घनमापन पध्दतीने पाणी घेत असल्यास ही तरतूद लागू होईल. (अभिप्राय) | स्विकृत. यानुसार तरतूद आदेशातील परिशिष्ट १, परिच्छेद ९.२ मध्ये केली आहे. |
| | ब-२ | हंगाम सुरु होण्यापूर्वी आगाऊ अदायगी केली असेल तर अनुज्ञेय दराच्या ९५ टक्के दर आकारला जाईल. (तरतूद)<br>-- आगाऊ अदायगी केली असेल तर पाणीपट्टी सूट देताना किती दिवस आधी अदायगी केली याचा विचार सवलतीची तरतूद करण्यासाठी करणे आवश्यक आहे. | स्विकृत. यानुसार तरतूद आदेशातील परिशिष्ट-१ परिच्छेद ९.३ मध्ये केली आहे. |

| अ. क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | प्रचलित पध्दतीनुसार हंगाम सुरु होण्याची तारीख व बील अदायगीची तारीख यात ८ महिन्याचा कालावधी असतो त्यामुळे हंगाम सुरु होण्यापूर्वी आगाऊ अदायगी केली तर अनुज्ञेय दराच्या ९०% दर आकारणे योग्य राहिल. (अभिप्राय) | |
| | ब-३ | जुन्या माजी मालगुजारी तलावांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयानुसार अनुज्ञेय ठरविलेले मोफत पाणी वापराचे हक्क अबाधित राहतील. (तरतूद)<br>--मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार तरतूद आहे. त्याचे अनुपालन बंधनकारक आहे. मोफत हा शब्द वगळण्यात यावा. (अभिप्राय) | स्विकृत, सदर तरतूद आदेशातील परिशिष्ट १, परिच्छेद ९.४ मध्ये दर्शविली आहे. |
| ३२. | परिशिष्ट १ पृ.क्र. १२ अ-४ | सिंचन पाणीपट्टीतील सवलतीत, सूक्ष्म सिंचन पध्दतीचा अवलंब केला असेल तर, अनुज्ञेय दराच्या ६५ टक्के दर अनुज्ञेय राहतील असे नमूद आहे. तथापि, याबाबतच अ.क्र. ब-१) मध्ये ७५ टक्के दर आकारला जाईल असे नमूद आहे. दरात तफावत असल्याने नेमक्या दराची स्पष्टता होणे आवश्यक आहे. | प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट १, परिच्छेद ९.२ मध्ये मीटरद्वारे घनमापन पध्दतीने पाणी घेऊन सूक्ष्म सिंचन पध्दतीचा अवलंब केल्यास ७५ टक्के दराने आकारणी करण्याची तरतूद करण्यात आली आहे. |
| ३३. | परिशिष्ट १ पृ.क्र. १२ अ-१ | सवलतीच्या तरतुदी अंतर्गत सिंचन पाणीपट्टीच्या सवलतीच्या तरतुदीमध्ये २ हे. पेक्षा कमी धारण क्षमता असलेल्या शेतकऱ्यांसाठी मूळ दराच्या ७५ % दर अनुज्ञेय राहतील असे नमूद केलेले आहे, लाभधारक शेतकऱ्यांच्या जमीन धारण क्षमतेबाबत निश्चित माहिती उपलब्ध होत नाही, त्यामुळे सदरची तरतुद वगळण्यांत यावी. | क्षेत्रीय अडचणी विचारात घेऊन सदरची तरतूद आता वगळण्यात आली आहे. |
| ३४. | परिशिष्ट १ पृ.क्र. १३ क-१ | दंडनीय तरतूदी : अनुज्ञेय कालावधी नंतर विलंबाने केलेल्या अदायगीकरिता आकारणी केलेल्या पाणीपट्टीवर अथवा त्यांच्या हिश्यावर १२ टक्के वार्षिक दंडात्मक दर आकारला जाईल (तरतूद)<br>-- दंडात्मक दराऐवजी "विलंब शुल्क" नमूद करावे.विलंबाने अदयागी केल्यास मूळ रक्कमेवर १% प्रती महिना दराने विलंब शुल्क आकारणीस सहमती आहे. (अभिप्राय) | या तरतुदीत महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६, कलम ८८(१) शी सुसंगत राहण्याचे दृष्टीने द.सा.द.शे. १० टक्के इतके विलंब शुल्क आकारणी निश्चित करण्यात येत आहे.( परिशिष्ट १, परिच्छेद १०.१ पहावा). |
| ३५. | नव्याने प्रस्तावित | **अन्य तरतुदी :** सिंचनासाठीच्या मंजूर पाणी वापराऐवजी जर घरगुती व औद्योगिक प्रकारात पाणीवापर केल्यास ज्या प्रकारात पाणीवापर होईल, त्याच्या दुप्पट दराने आकारणी करावी. | स्विकृत. आवश्यक तरतूद आदेशातील परिशिष्ट १, परिच्छेद १०.२ मध्ये करण्यात आली आहे. |
| ३६. | परि. ६.३ | पाणीपट्टी करारातील प्रस्तावित २० टक्के वाढ तसेच पाण्याच्या वापरानुसार दर | निकषाप्रमाणे फक्त १९ टक्के भार कृषी क्षेत्राने उचलणे अभिप्रेत आहे. |

| अ. क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | पृ.क्र. १० | आकारण्याचा निर्णय शेतकरी हितविरोधी आहे. | |
| ३७. | नव्याने प्रस्तावित | १ हेक्टर क्षेत्रामध्ये सरासरी ७० टन ऊस पिकाचे उत्पादन गृहित धरल्यास ऊस पीकातून केंद्र व राज्य शासनास प्रति टन ४११ प्रमाणे केंद्र व राज्य शासनास हेक्टरी रु. २८४७० करावद्वारे जमा होतात. त्यामुळे कृषी ग्राहकासाठी दरवाढ करु नये. | सदर कराची रक्कम केंद्र व राज्य शासनाकडून सिंचन प्रकल्पाचे देखभाल दुरूस्तीसाठी उपलब्ध होत नाही. आस्थापनेसह देखभाल दुरुस्तीसाठी लागणारी रक्कम पाणीपट्टीतून वसूल करण्याची अधिनियमात तरतूद आहे. त्यानुसार पाणीपट्टीचा दर ठरविण्यात येतो. |
| ३८. | नव्याने प्रस्तावित | मत्स्यशेतीसाठी पाणी वापराचे दर निश्चित करणे आवश्यक आहे. | प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट-१, परिच्छेद ७.२ नुसार मत्स्यशेतीसाठी सिंचनाचे दर अनुज्ञेय केलेले आहेत. |
| ३९. | परिशिष्ट १ पृ.क्र. १२, १३ | परिशिष्ट-१ अ-(४), अ(५) व (ब -१), (ब-२) मध्ये पुनरावृत्ती दिसून येते. | सूचना स्विकृत करुन आवश्यक दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. सदर तरतुदी सवलती व प्रोत्साहने या दोन्ही शिर्षकाखाली दर्शविल्या होत्या. त्यामुळे सवलती या शिर्षाखालील तरतुदी आता वगळण्यात येत आहेत. |
| ४०. | परिशिष्ट १ पृ.क्र. ११ | पाणी वापर संस्था व वैयक्तिक लाभधारकांकरिता घनमापन सिंचनाचे दर एकच असावेत. कारण सहकारी पाणी वापर संस्थांना देखभाल दुरुस्तीसाठी अनुदान मिळते | पाणीवापर संस्थांना प्रोत्साहनात्मक तरतूद मान्य निकषात आहे. या टप्प्यावर बदल करता येत नाही. |
| ४१. | नव्याने प्रस्तावित | पाणीपट्टी आकारणीची पध्दत साधी, सोपी असावी. | सूचना विचारात घेऊन या टप्प्यावर ज्या सुधारणा करणे शक्य आहे त्या करण्यात आल्या आहेत. |
| ४२. | नव्याने प्रस्तावित | सन २०१० मध्ये निश्चित केलेले दरात ७ वर्षांचा कालावधी उलटल्यानंतर आता प्रस्तावित, कृषि क्षेत्रासाठी २० टक्के वाढ, ग्रामपंचायत व नगरपालिकांच्या घरगुती वापराच्या पाणीपट्टी दरात वाढ नाही, महानगरपालिका क्षेत्रातील घरगुती वापरासाठी १४.३० टक्के वाढ, औद्योगिक वापरासाठी ३८ टक्के वाढ लक्षात घेता ही वाढ तुलनात्मकदृष्ट्या कमी आहे. | जलसंपदा विभागाने दिलेल्या खर्चाच्या अंदाजानुसार व जून २०१४ मध्ये सर्व उपभोक्त्यांशी सल्लामसलत करुन अंतिम केलेल्या निकषानुसार ही वाढ येत आहे. |
| ४३. | नव्याने प्रस्तावित | नदीच्या काठापासून किमान १०० मी. अंतरावर असलेला विहीर अथवा विहीर कुपनलिकेतून पाणी उपसा करताना स्वामित्व शुल्क वसूल करण्यात यावे. | याबाबत अधिसूचित नद्यांचे प्रभावक्षेत्र प्रथम अधिसूचित करावे लागेल. |

# ३. घरगुती विषयक अभिप्राय

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मसुदा संदर्भ</th><th>प्राप्त अभिप्राय</th><th>मजनिप्राचा प्रतिसाद</th></tr>
<tr><td>४४.</td><td>परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर. पृ.१४</td><td>सन २०१० मध्ये निश्चित केलेले दर नैसर्गिक वाढीमुळे या ७ वर्षात दुप्पट होणे अपेक्षित आहे. तथापि सदर नवीन दर सुसंगत नसल्याने तक्त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा आवश्यक वाटते -
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>वर्गवारी</th><th>पाणीपुरवठा प्रकार व स्त्रोत</th><th colspan="3">घरगुती दर ( रू प्रति घमी )</th></tr>
<tr><th></th><th></th><th></th><th>ग्राम पंचायत</th><th>नागरी स्थानिक संस्था</th><th>महानगर पालिका</th></tr>
<tr><td>१</td><td>किमान ८ महिन्यांच्या पाणी वापराच्या क्षमते इतका बंधारा स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असल्यास</td><td>संस्थेच्या खाजगी जलाशयातून किंवा जलाशय निर्मितीचा प्रमाणशीर खर्च संस्थेने सोसला असल्यास अशा जलाशयातून होणारा पाणी पुरवठा</td><td>~~०.०२~~<br>०.०५</td><td>~~०.०३~~<br>०.०६</td><td>~~०.०४~~<br>०.०९</td></tr>
</table>
</td><td>ठोक जल प्रशुल्क हे नैसर्गिक दरवाढीनुसार निश्चित करण्याची तरतूद विनिमयात नाही. निकष निश्चितीकरणाचे टप्प्यावर जलसंपदा विभागाने याविषयी कोणतेही अभिप्राय दिलेले नव्हते. याउलट मुंबई महानगरपालिकेने यापूर्वीच्या मूळ दराचे ३३ टक्के आकारणीस " महापालिकेने स्वखर्चाने धरणे बांधली असून स्वखर्चाने परिरक्षण करत आहे. त्यामुळे कोणतीही आकारणी करु नये " असा आक्षेप वेळीच नोंदवला होता. याचा विचार करुन मूळ दराचे १६ टक्के दर आकारणी करण्याचा निकष निश्चित झाला आहे व तो रास्त आहे.<br>मात्र या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, एखाद्या उपप्रवर्गाचे दर कमी झाले तरीही जलसंपदा विभागाचे महसूल अबाधीत राहतो. कारण सर्व प्रवर्गाचे दर निश्चित करताना अपेक्षित खर्चाचा विचार केलेला आहे. म्हणजेच ही घट अन्यत्र भरुन निघाली आहे.</td></tr>
</table>

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| ४५. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर. पृ.१४ | महापालिका, नगरपालिका क्षेत्रात दारिद्रय रेषेखालील ते श्रीमंत नागरीक रहात असतात. येथील झोपडपट्टी/गरीब वसाहतीचे पाण्याचे दर कमी असतात. त्यांच्या तुलतनेत व्यापारी संस्था, नागरीक वसाहती शैक्षणिक संस्था या आर्थिकदृष्टया सक्षम असतात. त्यांना जादा दर आकारणी करणे शक्य आहे.<br>व्यापारी संस्था, नागरी वसाहती, खाजगी वसाहत, धर्मादाय संस्था, शैक्षणिक संस्था इ. करिता महानगरपालिका क्षेत्रासाठीच्या दराच्या तिपटीने दर असावे. | स्विकृत. Townships साठी ५ पट आकारणीची तरतूद प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट-२, परिच्छेद ४ मध्ये करण्यात आलेली आहे. |
| ४६. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर अ-१. पृ.१४ | घरगुती पाणी वापरासाठी दर :- आश्वासीत पाणी पुरवठा अंतर्गत जलाशयातुन घरगुती पाणी पुरवठा असल्यास ग्राम पंचायती साठी रु. ०.१३ प्रति घ.मी., नागरी स्थानिक संस्था साठी रु. ०.१६ प्रति घमी व महानगर पालीकासाठी रु. ०.२४ घमी असे दर प्रस्तावात प्रस्तावित केले आहेत. लाभक्षेत्रातील विहीरी व प्रभावक्षेत्रातील विहीरी वरुन घरगूती पाणी पुरवठा असल्यास रु. ०.१३ प्रती घ.मी. दर दर्शविला आहे. परंतु हा दर कोणत्या संस्थेसाठी (ग्रामपंचायत / नागरी संस्था / महानगरपालिका) आहे हे स्पष्ट नाही. बिगर सिंचन साठीचे विहीरी वरील आकारणी सिंचन क्षेत्राच्या आकारणी प्रमाणे ५०% घेण्यास हरकत नसावी. | सूचना विचारात घेऊन याबाबतची तरतूद आदेशातील परिशिष्ट-२, परिच्छेद ६.१ मध्ये करणेत आली आहे. |
| ४७. | नव्याने प्रस्तावित | स्थानिक स्वराज्य संस्था घरगुती वापरासाठी पाणी घेत असल्या तरी यातील काही भाग औद्योगिक व्यावसायिक प्रयोजनार्थ करतात. उदा. हॉटेल, नवीन बांधकामे, उद्योग इत्यादी. | स्थानिक स्वराज्य संस्थांना मानक दराने पुरवावयाच्या पाण्याचे परिमाण लोकसंख्या, निकष व १५ टक्के गळती ( UFW) इतकेच मर्यादेत आहे. ११५ टक्के ते १४० टक्के परिमाणासाठी १.५ पट दर आहेत व १४० टक्केचे पुढे २ पट दर आहेत. यामुळे वाढीव गळती, व्यावसायिक वापर यासाठीचे दर आपोआपच वाढीव राहणार आहेत. तसेच जलसंपदा विभागाची मान्यता न घेता स्थानिक स्वराज्य संस्था उद्योगास पाणी पुरवठा करीत असल्यास अशा प्रकरणी अनुज्ञेय औद्योगिक दराचे ३ पट दराने आकारणी प्रस्तावित आहे. (आदेशातील परिशिष्ट-२, परि ७.२) |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| ४८. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर परि. क-१). पृ.१५ | जलसंपदा विभागाकडून पुरविण्यात येणा-या ठोक पाणी वापराची अनुज्ञेय मर्यादा २०० एलपीसीडी गृहित धरावी. | तज्ञ तसेच सर्व उपभोक्त्यांशी सल्लामसलत करुन पुरवठयाच्या मर्यादा विचारात घेऊन संपूर्ण राज्यासाठी घरगुती पाणी वापरासाठीचे निकष प्राधिकरणाने दिनांक २२ सप्टेंबर २०१७ चे आदेशाने निश्चित केले आहेत. त्या मर्यादेतच वापर सीमित करणे आवश्यक आहे. सदर निकष प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट-२, परिच्छेद २ मध्ये उधृत केलेले आहेत. |
| ४९. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर.पृ. १४ | पाणी पुरवठयाचे स्त्रोतानुसार ग्रामपंचायत, स्थानिक नागरी संस्था (नगरपालिका / नगरपरिषदा), महानगरपालिका या तीन उपयोगाकरिता घरगुती ठोक पाणी पुरवठयाचे घनमापन सध्याचे दि. २९/६/२०११ शासन निर्णयानुसारचे मूळ दर व आता प्रस्तावित दराची तुलना खालीलप्रमाणे आहे: सध्या बिगर सिंचनासाठी वर्गवारी नुसार जलप्रशुल्काचे दर रब्बी, खरीप व उन्हाळी हंगामाकरिता वेगवेगळे दर म्हणजे रब्बी हंगामाच्या दराच्या ५० टक्के दर खरीपासाठी व १५० टक्के दर उन्हाळी हंगामासाठी निश्चित केलेले आहेत. परंतु आता वर्गवारीनुसार वर्षभरात सरसकट दर प्रस्तावित आहेत. यावरुन असे दिसून येते की, ग्रामपंचायत व नगरपालिकांच्या दरात वाढ नाही. परंतु महानगरपालिकांसाठीच्या दरात १४.३० टक्के वाढ प्रस्तावित आहे. | हा मुद्दा निरीक्षणात्मक आहे.<br>बिगर सिंचन वापर हा हंगामनिहाय (सिंचनासारखा) बदलत नाही. त्यामुळे आकारणीच्या सुलभतेसाठी खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठीचा सरासरी दर संपूर्ण वर्षासाठी प्रस्तावित केला आहे. |
| ५०. | परिशिष्ट-१, (२) परि. क-६. पृ.१६ | अवर्षण कालावधीत जलाशयातून प्रत्यक्ष वापर केलेल्या पाण्यावरच आकारणी करणे योग्य होईल. | जलाशयातील उपलब्ध पाण्यावर आरक्षण करुन ते न वापरल्यास त्यावर मानक दराने पाणीपट्टी अनुज्ञेय राहील. याबाबतची तरतूद परिशिष्ट-२, परिच्छेद ५.४ मध्ये करणेत आली आहे. |
| ५१. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी | घरगुती पाणी वापरासाठी आरक्षण केले असल्यास व त्याऐवजी शेती/हिरवळ वृक्षारोपण पाणी वारल्यास वार्षिक मंजूर कोटयातून जास्तीत जास्त १० टक्के पर्यंत किंवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे कमी असेल तेवढया परिमाणासाठी | घरगुती पाणी पुरवठा हा लोकसंख्या व वापराचे निकष या आधारेच करणे अभिप्रेत .<br>हिरवळ/वृक्षारोपण यासाठी प्रक्रिया केलेले पाणी वापरणे अभिप्रेत आहे. |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | वापरासाठीचे दर. पृ.१४ | सिंचनाच्या दराने पाणीपट्टी आकारण्यात येईल. परंतु यासाठी शेतीसाठी वापरणा-या पाण्यावर स्वतंत्र मोजमापक बसविण्याची व्यवस्था केली असली पाहिजे. | |
| ५२. | परिशिष्ट-१, घरगुती पाणी वापरासाठीचे दर. पृ.१४ | सन २०१७-१९ या कालावधीकरिता आश्वासित पाणी पुरवठयाकरिता (जलाशयातून पाणी वापर) प्रस्तावित केलेली १४.२८ टक्के दरवाढ खूप जास्त आहे. प्रत्येक ३ वर्षानी ५ टक्के दरवाढ मर्यादित ठेवावी. | पाणीवापराची कार्यक्षमता वाढविणे, पाणीनाश कमी करणे व वितरण व्यवस्थेच्या शेवटच्या शेतक-यापर्यत पाणी पुरविणे, सिंचन प्रकल्पामुळे मिळणारे लाभ तसेच पुढे चालू ठेवणे यासाठी धरणे व वितरण व्यवस्था सुस्थितीत ठेवणे गरजेचे आहे. मजनिप्रा अधिनियम २००५ मधील कलम ११(घ) मधील तरतुदीनुसार सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षण खर्चाची तरतूद परावर्तीत होईल अशा‍त-हेने पाण्याचे दर ठरविण्याची तरतूद आहे. तसेच जून २०१४ मध्ये उपभोक्त्यांची मते जाणून घेऊन अंतिम केलेल्या निकषांनुसार खर्चाच्या २२ टक्के भार घरगुती वापराच्या प्रवर्गाने उचलणे अभिप्रेत आहे. या तरतुदीनुसार होणारी दरवाढ अपरिहार्य आहे. पाणी वापरात बचत करुन पाणीपट्टी मर्यादित करणे अभिप्रेत आहे. सन २०१७-१८ करिता निर्धारित केलेल्या दरामध्ये दरवर्षी १० टक्के वाढ करण्याचे प्रस्तावित आहे. |
| ५३. | नव्याने प्रस्तावित | **अन्य अतिरीक्त तरतुदी :**<br>-- घरगुती ऐवजी औद्योगिक पाणी वापर केल्यास अशा वापरलेल्या परिमाणास औद्योगिक दराच्या दुप्पट दराने आकारणी करावी. | स्विकृत. याबाबतची तरतूद प्राधिकरण आदेश परिशिष्ट-२, परिच्छेद ७.२ मध्ये करणेत आली आहे. |
| ५४. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर परि.अ-१). पृ. १४ | **अ) सवलतीच्या तरतुदी**<br>लाभक्षेत्रात विहीर, सिंचन प्रकल्पाचे प्रभाव क्षेत्रातील विहीर (लाभक्षेत्राचे सीमेपासून १ किमी परिसर) जलाशयाचे प्रभाव क्षेत्रात विहीर (पूर्ण संचय पातळी पासून १ किमी परिसर) पाणी पुरवठयाचा स्त्रोत असलेस रु. ०.१३ प्रति घ.मी. हा सवलतीचा दर अनुज्ञेय राहील.<br>---सदर तरतूद सवलत म्हणून राहणार नाही. महाराष्ट्र सिंचन कायदा १९७६ कलम ५५ मधील तरतुदीनुसार लाभक्षेत्रातील विहीर, सिंचन | सदर तरतूद महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ कलम ५६ चे चौकटीत सुधारित करण्यात आली आहे (परिशिष्ट २, परिच्छेद ६.१) |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | प्रकल्पाचे प्रभाव क्षेत्रातील विहीर (लाभक्षेत्राचे सीमेपासून ३५ मी. परिसर), जलाशयाचे प्रभाव क्षेत्रातील विहीर (पूर्ण संचय पातळी पासून ३५ मी. परिसर) हा पाणी पुरवठयाच्या स्त्रोत असल्यास अ.क्र.४ च्या वर्गवारी प्रमाणे हा दर अनुज्ञेय राहील. | |
| ५५. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर परि. ब-१). पृ. १४-१५ | **ब) प्रोत्साहनात्मक तरतुदी :**<br>नगरपालिका / महानगरपालिका (स्था. स्व.संस्था), यांना पुरवठा केलेल्या पाण्याचा वापर झाल्यावर निर्माण होणारे प्रक्रियायुक्त सांडपाणी विक्री करण्यास सवलत दिली आहे. यास आक्षेप आहे.<br>या संस्थांनी पाण्यावर मानकाप्रमाणे प्रक्रिया करुनच नदीत/अथवा नेमून दिलेल्या ठिकाणी )कालवा, जलाशय इ.) सोडणे कर्तव्य आहे व बंधनकारक आहे. (Polluters to pay) हे सर्वसामान्य तत्व आहे. त्यामुळे त्यांना यासाठी प्रोत्साहनात्मक तरतूद देणे उचित नाही.<br>तसेच बिगर सिंचन वापरकर्त्याचे पाणी वापरानंतर निर्माण होणा-या सांडपाण्याचे परिमाण (पुर्नउद्भववावर निर्माण होणारे पाणी) याचा हिशेब कृष्णातंटा लवाद व इतर नदी खो-यांच्या लवादात घेतलेला आहे. त्या पाण्याचे वाटप व प्रकल्पनिहाय विभागणी देखील केलेली आहे.<br>अशाप्रकारे सांडपाणी विक्रीस परवानगी दिल्यास जलनियोजनावर परिणाम होतील ते लवादाच्या निवाडयाला व कराराला छेद दिल्यासारखे होईल. त्यामुळे ही सवलत रद्द करावी.<br>महानगरपालिकेला पाणी वापराचे हक्क दिले आहेत. विल्हेवाट लावण्याचे किंवा विक्रीची परवानगी नाही. पाणी वापरुन झाल्यानंतर ते परत करणे आवश्यक आहे. कारण त्याप्रमाणे जलआराखडा तयार करण्यात आला आहे. (उदा. गोदावरी जल आराखडा) सांडपाणी पुनर्प्रक्रिया करुन विक्रीचा हक्क मिळाल्यास ते कायमस्परुपी हस्तांतरीत केल्यासारखे होईल. | नगर विकास विभागाने जलसंपदा विभागाचे सहमतीने " नागरी भागातील सांडपाणी प्रक्रिया पुन:चक्रीकरण व व पुनर्वापर धोरण " दिनांक ३० नोव्हेंबर २०१७ चे शासन निर्णयानुसार जाहीर केले आहे. सदर धोरणाशी सुसंगतच सदर तरतूद आहे. याबाबतची पार्श्वभूमी व मजनिप्राची विचारधारा स्पष्ट करणारी टिप्पणी (परिशिष्ट-१) पहावी. |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | बिगर सिंचन वापरकर्त्याचे पाणी वापरानंतर निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पुनर्वापर केल्यास मंजूर कोटयात आपोआप बचत होणार आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पुनर्वापर केलेल्या पाण्याची फेरमोजणी करुन पाणीपट्टी आकारण्यात येणार नाही. | |
| ५६. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर परि. ब-१ पृ.१५ | प्रोत्साहनात्मक तरतुदीमधील मधील परिच्छेद २ मध्ये क्षेत्रिय वाटप या शब्दाऐवजी अनुज्ञेय पाणीवापर असा शब्दप्रयोग असणे योग्य होईल. | याबाबतची तरतूद आता आदेशातील परिच्छेद १० नुसार सुधारित करणेत आली आहे. |
| ५७. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर परि. क-१,). पृ. १५ | **दंडनीय तरतुदी :**<br>**अनुज्ञेय पाणी वापराच्या मर्यादा व त्यापेक्षा जास्त वापरास दंडनीय आकार**<br>१) अनुज्ञेय वार्षिक पाणीवापराचे परिमाण कोटा दरवर्षी १५ ऑक्टोबरच्या पाणी साठयावर आराधीत व संस्थेच्या मागणी आधारीत नियोजनानुसार ३० ऑक्टोबर पर्यंत निश्चित करावे. १ नोव्हेंबर ते ३० ऑक्टोबर हा अनुज्ञेय वार्षिक कोटा कालावधी असेल.<br>२) पाण्याचे आरक्षण करुन पाणी न वापरल्यास मंजूर आरक्षणाच्या ९० टक्के परिमाणावर आकारणी करावी.<br>३) सदर दंडनीय तरतूद खालीलप्रमाणे असावी. अनुज्ञेय पाणी वापराच्या मर्यादेच्या ११० टक्के पर्यंतच्या पाणी वापर परिमाणसाठी अनुज्ञेय दराने आकारणी केली जाईल. अनुज्ञेय पाणी वापराच्या ११० टक्के च्या पुढील वापरासाठी अनुज्ञेय दराच्या १.५० पट दराने आकारणी केली जाईल. | अनुज्ञेय पाणीवापराचा हिशोब जल वर्षानुसार (१ जुलै ते ३० जून ) ठेवणे उचित होईल. अन्य तरतुदी प्राधिकरणाचे दिनांक २२ सप्टेंबर २०१७ चे निकषानुसार राहतील. |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | ४) अनुज्ञेय पाणीवापर काढताना २०११च्या जनगणनेनुसार लोकसंख्या + २ टक्के वार्षिक वाढ + १० टक्के तरल लोकसंख्या यानुसार एकत्रित लोकसंख्या काढावी.<br><br>यापेक्षा शहराची लोकसंख्या वाढ जास्त असल्यास/हद्द वाढ झाल्यास आयुक्त मनपा/मुख्याधिकारी नगरपालिका यांनी प्रमाणित केलेली लोकसंख्येनुसार अनुज्ञेय पाणीवापर काढावा. | |
| ५८. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर परि. क-१. पृ. १५ | प्रस्तावित जलदरात, ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या **अनुज्ञेय पाणी वापराची** मर्यादा अ.क्र. **क-१)** मध्ये नमूद केली असून, या अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त पाणी वापराबाबत टप्पानिहाय दंडनीय दर प्रस्तावित केलेले आहेत. तथापि, सदर प्रस्तावित दरात बिगर सिंचन **पाणी आरक्षणाबाबत लेखबध्द/बांधिलकी आकाराबाबत** तरतूद आढळत नसून अशी तरतूद असणे आवश्यक असल्यामुळे, खालीलप्रमाणे तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.<br><br>जलसंपदा विभागाशी करारनामा करताना बिगर सिंचन पाणी वापरकर्त्यांनी अंतिम पाणी मागणीप्रमाणे टप्प्या-टप्प्याप्रमाणे पाणी वापर करण्याचे नियोजन नमूद करावे. अंतिम पाणी मागणीप्रमाणे पुरवठा सुरु होईपर्यंत वर्षनिहाय खालीलप्रमाणे आकारणी करण्यात येईल :<br>अ) टप्प्यानुसार ठरवून घेतलेल्या प्रमाणात पाणी वापर असल्यास लागू दराने आकारणी<br>आ) टप्प्यानुसार ठरवून घेतलेल्या पाणी वापरापेक्षा १० टक्के पाणीवापर (अधिक / कमी ) झाल्यास, फरकाच्या वापरास दंडनीय दर - लागू दराच्या १.५० पट.<br>इ) उर्वरित प्रमाणाकरिता म्हणजे अंतिम नियोजन पाणीवापर वजा टप्प्यानुसार नियोजित पाणी वापराकरिता, बांधिलकी / लेखबध्द | बिगर सिंचन पाणी वापरासाठीचे टप्पा नियोजन, बांधिलकी शुल्क (Commitment Charges) , दंडनीय तरतूद याबाबतची तरतूद आदेशातील परिच्छेद ४ मध्ये केलेली आहे. तसेच याबाबतचे स्पष्टीकरणात्मक उदाहरण आदेशातील परिशिष्ट-४ मध्ये दिले आहे. |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | आकार लागू दराच्या ५ टक्के वार्षिक प्रमाणे आकारण्यात येईल. | |
| ५९. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर परि. क-१) पृ. १५ | पाणीवापर मर्यादेच्या ११०% पेक्षा जादा पाणीवापरास दंडनीय आकारणी करण्याचे नमूद केले आहे. यापुर्वी विविध नगरपालिका व महानगरपालिका यांना जलसंपदा विभागामार्फत पाणीकोटा मंजुर करण्यांत आलेला आहे. सदर पाणीकोटा हा अनुज्ञेय पाणी वापर मर्यादेपेक्षा जास्त आहे. त्यामुळे वरीलप्रमाणे दंडनीय आकारणी करतांना मंजुर पाणीवापरापेक्षा ११०% पेक्षा जादा होणाऱ्या पाणीवापरास दंडनीय दर आकारण्याची तरतुद असावी. | म.ज.नि.प्रा. ने दिनांक २२ सप्टेंबर २०१७ रोजी " Criteria for Distribution of Surface Water Entitlements by River Basin Agencies for Domestic and Industrial Uses " निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार नागरी स्वराज्य संस्थेच्या entitlement लोकसंख्येवर आधारित निकषानुसार १५ टक्के U.F.W.विचारात घेऊन निश्चिती केली आहे. त्यानुसार आवश्यक सुधारणा आदेशात करण्यात आल्या आहेत. |
| ६०. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर परि. क-२)पृ१५ | **सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचा कार्यक्रम सादर न केल्यास दंड**<br>सहमती आहे, तथापि, नगरपालिका/महानगरपालिका, असे मोघम न करता आयुक्त, महानगरपालिका/मुख्याधिकारी, नगरपालिका असा उल्लेख व्हावा. | स्विकृत. याबाबतची तरतूद आदेशातील परिशिष्ट-२, परिच्छेद ५.२ मध्ये केली आहे. |
| ६१. | परिशिष्ट-१, (२) घरगुती पाणी वापरासाठीचे दर परि. क-४) पृ. १६ | करारनामा न करता पाणी वापरल्यास १.५० पट दर आकारणी करावी.<br>-- करारनामा न करता पाणी वापरल्यास मूळ आकारणीच्या ५० टक्के दंड आकारणी करावी (उदा. मूळ आकारणी १०० रु. असल्यास दंड म्हणून रु. ५०/- म्हणजेच १५०/- रु. एकूण आकारणी करावी.<br>क ५) मीटर नसल्यास वा बंद आढळलेस मंजूर परिमाण किंवा लगतच्या कालावधीतील वापर यापैकी जे जास्त असेल त्या परिमाणावर १.५० पट दर आकारणी करावी.<br>-- मीटर नसल्यास वा बंद आढळलेस मंजूर परिमाण किंवा लगतच्या कालावधीतील वापर यापैकी जे जास्त असेल त्या परिमाणावर मूळ आकारणीच्या ५० टक्के दंड वसूल करण्यात यावा. (उदा. मूळ आकारणी | स्विकृत. याबाबतची तरतूद आदेशातील परिशिष्ट-२ परिच्छे ७.१ मध्ये करण्यात आली आहे.<br>स्विकृत. याबाबतची तरतूद परिशिष्ट-२, परिच्छेद ७.३ मध्ये करणेत आली आहे. |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | १०० रु. असल्यास दंड म्हणून रु. ५०/- म्हणजेच १५०/- आकारणी करावी. (लगतच्या कालावधीतील परिमाण उपलब्ध नसल्यास पंपाच्या विसर्गक्षमतेनुसार २४ तासासाठी परिमाण काढावे). परिस्थिती नुसार उपरोक्त दोन्ही दंड स्वतंत्रपणे आकारण्यात यावेत. | |
| ६२. | परिशिष्ट-१, (२) परि. क-५)पृ. १६ | मीटर बसविणेसाठी/चालु करणेसाठी १ महिन्याची नोटीस देऊन या कालमर्यादेत पुर्तता न झालेस पाणीपुरवठा बंद करणेत यावा. ही तरतुद वगळण्यांत यावी. नगरपालिका/महानगरपालिका/ग्रामपंचायती यांचेसाठी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा असल्याने पाणीपुरवठा बंद करणे शक्य होत नाही. त्यामुळे फक्त दंडनीय दराने आकारणी करणे हे योग्य होईल. | सूचना स्विकारुन आदेशात आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. (परिशिष्ट-२, परिच्छेद ७.३) |
| ६३. | परिशिष्ट-१, (२) परि. क-६). पृ. १६ | पेयजल पुरवठयाच्या प्रयोजनार्थ अवर्षण कालावधीत जलाशयातून करण्यात आलेल्या आरक्षणासाठी (प्रत्यक्ष वापर कमी असला तरी परिमाणास पूर्ण बाष्पीभवन व वहनव्ययासह एकूण) आकारणी केली जाईल.<br>-- सहमती आहे. | याबाबतची तरतूद प्राधिकरण आदेशातील परिशिष्ट-२, परिच्छेद ५.४ मध्ये करणेत आली आहे. |

## परिशिष्ट-१

### महानगरपालिका/नगरपालिका यांना सांडपाणी प्रक्रिया करुन विक्रीची मुभा देण्याबाबतची पार्श्वभूमी स्पष्ट करणारी टिप्पणी

महाराष्ट्र राज्य जलनिती २००३ कलम २.३ नुसार राज्याच्या जलसंपत्तीचा दर्जा शाश्वत स्वरुपात संरक्षित करुन जनतेसाठी जलसंपत्तीची उपयोगिता जतन करणे अभिप्रेत आहे. " जलस्त्रोत गुणवत्ता व्यवस्थापनाचे " दृष्टीने प्रस्तावित तरतूद आवश्यक आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेने सांडपाणी विहीत मानकानुसार प्रक्रिया करुनच नदी-नाल्यात सोडणे आवश्यक आहे. मात्र सांडपाणी Collection व उत्सर्जित जलप्रक्रिया केंद्राच्या ( STP) देखभाल दुरुस्तीचा खर्च मोठा असल्याने ब-याचशा महानगरपालिका/नगरपालिका संपूर्ण सांडपाण्यावर प्रक्रिया करत नाहीत असा सद्याचा अनुभव आहे. त्यामुळे खालील बाजूचे जलस्त्रोताची गुणवत्ता खालावते ही वस्तुस्थती आहे. (उदा. उजनी जलाशय, गोसीखुर्द जलाशय ) . त्यामुळे नागरी स्वराज्य संस्थेचे प्रक्रिया केलेले सांडपाणी नैसर्गिक पाण्याचे स्त्रोतात न मिसळता प्रक्रिया केंद्रावरुन त्याची थेट पुनर्वापरासाठी विल्हेवाट लावणे हे जलस्त्रोत गुणवत्तेच्या दृष्टीने आवश्यक ठरते. या पुनर्वापरामुळे नैसर्गिक जलस्त्रोतावरील ( Fresh Water Resource ) ताण त्या प्रमाणात कमी होणार आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ कलम १२ (५), महाराष्ट्र जलनिती २००३, कलम २.३ व २.२.३, नगर विकास विभागाचा दिनांक ३० नोव्हेंबर २०१७, चा शासन निर्णय विचारात घेऊन ही तरतूद अंतिम करण्यात येत आहे.

सांडपाण्यावर प्रक्रिया करणे, प्रक्रिया केलेल्या पाण्याचे पुनर्वापराच्या ठिकाणी वहन करणे या बाबी खर्चिक आहेत. यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, म.ज.नि.प्राधिकरणाने २३ व २४ ऑगष्ट २०१७ रोजी जल क्षेत्रातील तज्ञ, ठोक जल वापरकर्ते (महापालिका, नगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, ओद्योगिक संस्था) व पाणी विषयक विभागात काम करणा-या शासकीय अधिका-यांचे दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजित केले होते. सदर चर्चासत्राचा अहवाल प्राधिकरणाचे संकेत स्थळावर आहे. यामधील याबाबतच्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत -

अ) स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रक्रिया केलेल्या पाण्यावर त्यांचाच हक्क असावा.

ब) प्रक्रिया केलेले सांडपाणी इच्छुक वापरकर्त्यास विकून मिळणा-या उत्पन्नातून प्रक्रिया केंद्राचा खर्च भागविण्यासाठीची मुभा स्थानिक स्वराज्य संस्थेस असावी.

क) प्रक्रिया केलेले सांडपाणी नैसर्गिक नदीचे प्रवाहात सोडू नये.

राज्यातील औद्योगिक पाणीवापर हा ३ टक्क्यापेक्षा कमी आहे. यातील काही उद्योग प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याकडे वळल्यास त्याचा पुनर्दभवावर होणारा परिणाम नगण्य असेल. तसेच कार्यान्वित उद्योगांनी सांडपाणी वापरल्यास त्यांचे नैसर्गिक पाण्याचे आरक्षण कमी होणार आहे. नवीन उद्योगाचे बाबतीत नैसर्गिक स्त्रोतावर ताण येणार नाही. त्यामुळे जलनियोजनावर विपरित परिणाम होणार नाही. याउलट नैसर्गिक जलस्त्रोताची गुणवत्ता सुधारणेस या धोरणामुळे मदतच होणार आहे. जलसंपदा विभागाचे सहमतीने नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१६/प्रक्र.२५९/नवि-३३, दिनांक ३० नोव्हेंबर २०१७ मधील राज्य शासनाचे धोरणाशी सुसंगत अशी ही तरतूद आहे.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY MWRRA DOMESTIC AGRICULTURE INDUSTRY

# ४. औद्योगिक विषयक अभिप्राय

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मसुदा संदर्भ</th><th>प्राप्त अभिप्राय</th><th>मजनिप्राचा प्रतिसाद</th></tr>
<tr>
<td>६४.</td>
<td>परिशिष्ट-१,<br>(३) औद्योगिक पाण्याचे दर - तक्त्यातील अ.क्र.४. पृ.१६</td>
<td>

**११)३) औद्योगिक पाण्याचे दर**

सन २०१० मध्ये निश्चित केलेले दर नैसर्गिक वाढीमुळे या ७ वर्षात दुप्पट होणे अपेक्षित आहेत. प्रस्तावित दर ०.७० (- ६५.४ टक्के) सुसंगत नसल्याने तक्त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करणे आवश्यक आहे.

<table>
<tr><th rowspan="2"></th><th rowspan="2">वर्गवारी</th><th rowspan="2">पाणीपुरवठा प्रकार व स्रोत</th><th colspan="2">औद्योगिक दर<br>(रू प्रति घमी)</th></tr>
<tr><th>प्रक्रिया</th><th>कच्चा माल</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr>
<tr><td>१</td><td>किमान ८ महिन्यांच्या पाणी वापराच्या क्षमते इतका बंधारा स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असल्यास</td><td>संस्थेच्या खाजगी जलाशयातून किंवा जलाशय निर्मितीचा प्रमाणशीर खर्च संस्थेने सोसला असल्यास अशा जलाशयातून होणारा पाणी पुरवठा</td><td>~~०.७०~~<br>१.५</td><td>~~१७.६०~~<br>३८.००</td></tr>
</table>

महाराष्ट्र सिंचन कायदा १९७६ कलम ५५ मधील तरतुदीनुसार लाभक्षेत्रातील विहीर, सिंचन प्रकल्पाचे प्रभाव क्षेत्रातील विहीर (लाभक्षेत्राचे सीमेपासून ३५ मी.

</td>
<td>

ठोक जल प्रशुल्क हे नैसर्गिक दरवाढीनुसार निश्चित करण्याची तरतूद विनिमयात नाही. निकष निश्चितीकरणाचे टप्प्यावर जलसंपदा विभागाने याविषयी कोणतेही अभिप्राय दिलेले नव्हते. याउलट मुंबई महानगरपालिकेने यापूर्वीच्या मूळ दराचे ३३ टक्के आकारणीस " महापालिकेने स्वखर्चाने धरणे बांधली असून स्वखर्चाने परिरक्षण करत आहे. त्यामुळे कोणतीही आकारणी करु नये " असा आक्षेप वेळीच नोंदवला होता. याचा विचार करुन मूळ दराचे १६ टक्के दर आकारणी करण्याचा निकष निश्चित झाला आहे.<br>मात्र या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, एखाद्या उपप्रवर्गाचे दर कमी झाले तरीही जलसंपदा विभागाचे महसूल अबाधीत राहतो. कारण सर्व प्रवर्गाचे दर निश्चित करताना अपेक्षित खर्चाचा विचार केलेला आहे. म्हणजेच ही घट अन्यत्र भरुन निघावी लागेल.

सदर तरतूद महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ कलम ५६ चे चौकटीत सुधारित

</td>
</tr>
</table>

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | परिसर) जलाशयाचे प्रभाव क्षेत्रातील विहीर (पूर्ण संचय पातळी पासून ३५ मी. परिसर) हा पाणी पुरवठयाच्या स्त्रोत असल्यास अ.क्र. ४ च्या वर्गवारी प्रमाणे हा दर अनुज्ञेय राहील. | करण्यात आली आहे. |
| ६५. | परिशिष्ट-१, (३) औद्योगिक पाण्याचे दर, अ-१). पृ. १७ | **१२)अ) औद्योगिक वापरासाठी सवलतीच्या तरतुदी -**<br>अ-१) कृषी उद्योगासाठी : कुक्कुटपालन, राई मील, दुग्ध व्यवसाय, ऊस प्रक्रिया, मक्यावरील प्रक्रिया, वनस्पती तूप इ. साठी ७५ टक्के दराने आकारणी करण्याची तरतूद रद्द करावी. | सूचना विचारात घेऊन ऊस व मक्यापासून अल्कोहोल निर्मितीसाठीची सवलत रद्द केली आहे. |
| ६६. | परिशिष्ट-१, (३) औद्योगिक पाण्याचे दर, ब-१). पृ. १७<br><br>परिशिष्ट-१, (३) औद्योगिक पाण्याचे दर, ब-२). पृ. १७ | **१३) ब - प्रोत्साहनात्मक तरतुदी**<br>ब-१) जर एखादा उद्योग पाण्याचा पुनर्वापर करुन पाणी वापर कमी करत असल्यास (पुनर्वापराच्या सहाय्याने नक्त पाणी मागणी किमान ७५टक्के वा त्यापेक्षा कमी करीत असेल तर ) अनुज्ञेय दराच्या ७५ टक्के दराने आकारणी करावी.<br>--अशी अट क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणीसाठी किचकट आहे. त्यात तंटे उद्भवतात. त्याऐवजी खालीलप्रमाणे समाविष्ट करावे<br>जर एखादा उद्योग सांडपाण्याचा पुनर्वापर करुन नैसर्गिक पाणी वापर कमी करत असल्यास पुनर्वापर केल्यामुळे परिमाणात घट होऊन सवलत मिळते म्हणून सवलत देण्याची आवश्यकता नाही. " स्वत:च्या पुनर्पाणी वापराची फेरमोजणी करुन पाणीपट्टी आकारण्यात येणार नाही. "<br>ब-२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकानुसार सांडपाणी शुध्दीकरण करणा-या संस्थांना ५० टक्के आकारणी करावी.<br>--सांडपाण्याची गुणवत्ता तपासणे व त्यावर कारवाई करणे ही पूर्णत: २.प्र.नि. मंडळाच्या अखत्यारीतील बाब आहे. तसेच अशाप्रकारे नियमित कालावधीच्या अंतराने तपासणी करणेची यंत्रणा म.प्र.नि. मंडळ वा जलसंपदा विभागाकडे नाही. | औद्योगिक सांडपाण्याचा पुनर्वापर केल्याने नैसर्गिक पाण्यावरील ताण कमी होतो. तसेच प्रदूषणही कमी होते. त्यामुळे पुनर्वापरासाठी प्रोत्साहन देणेचे उद्देशाने ही तरतूद आहे. त्यामुळे ती कायम ठेवणेत आली आहे.<br><br>सूचना स्विकृत. सदर तरतूद आता वगळण्यात आली आहे. |

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY MWRRA DOMESTIC AGRICULTURE INDUSTRY

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | त्यामुळे हया तरतुदीचे पालन करताना त्याचा गैरफायदा उद्योग घेतील व सूट मिळवतील. Polluter to pay या सवसामान्य तत्वानुसार मानकानुसार सांडपाणी प्रक्रिया करुन सोडणे हे कर्तव्य व बंधनकारक आहे. कर्तव्याचे पालन करण्यासाठी ५० टक्के सूट देणे उचित नाही ही तरतूद वगळावी. | |
| ६७. | परिशिष्ट-१, (३) औद्योगिक पाण्याचे दर, क-१), पृ.१७<br><br>परिशिष्ट-१, (३) औद्योगिक पाण्याचे दर, क-२) पृ. १७<br><br>परिशिष्ट-१, (३) औद्योगिक पाण्याचे दर, क-३,४ व ५). पृ. १७ | **१४) क) दंडनीय तरतुदी :**<br>क-१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विहित मानकानुसार सांडपाणी प्रक्रिया न केल्यास ३ पट दर आकारणी करावी<br>--घरगुती पाणी वापर कर्त्यांना ही दंडात्मक तरतूद ठेवलेली नाही, ही असमानता आहे<br>म.प्र.नि. मंडळाने अशाप्रकारच्या विहित मानकांचे पालन न करणा-या उद्योगांची नावे कळविल्यास त्यांना १०० टक्के दंड आकारणी करावी व तसेच म.प्र.नि. मंडळाने कळविल्यास पाणी पुरवठा खंडीत करण्यात यावा अशी तरतूद असावी.<br>क-२) मंजुरीशिवाय किंवा मंजुरीबाहेरील पाणी वापर परिमाणावर १.५० पट दर आकारणी करावी.<br>--करारनामा न करता पाणी वापरल्यास मूळ आकारणीच्या ५० टक्के दंड म्हणून वसूल करावा. (उदा. मूळ आकारणी १०० रु. असल्यास दंड रु. ५०/- म्हणजेच १५०/ रु. एकूण आकारणी करावी.<br>क-३) मंजुरी असताना तथापि करारनामा न करता पाणी वापर केल्यास मंजूर परिमाण व १.२५ पट दर आकारणी करावी.<br>--मीटर नसल्यास वा बंद आढळलेस मंजूर परिमाण किंवा लगतच्या कालावधीतील वापर यापैकी जे जास्त असेल त्या परिमाणावर मूळ आकारणीच्या ५० टक्के दंड वसूल करण्यात यावा (उदा. मूळ आकारणी १०० रु. असल्यास दंड म्हणून रु. ५०/- | याबाबतची तरतूद आदेशातील परिशिष्ट-३, परिच्छेद ६.१ मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार म.ज.नि.प्रा. चे दिनांक २२/७/२०१७ चे निकष (परिच्छेद ७.२ (vii) मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे. प्रदूषण करणा-या उद्योगाबाबत निर्धारित केलेल्या मानक दराच्या दुप्पट दराने आकारणी करण्याची तरतूद प्राधिकरणाचे आदेशात केली आहे.<br><br>अंतिम केलेल्या निकषात बदल करण्याची आवश्यकता नाही. |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | नव्याने प्रस्तावित | म्हणजेच १५०/- रु. आकारणी करावी. (लगतच्या कालावधीतील परिमाण उपलब्ध नसल्यास पंपाच्या विसर्ग क्षमतेनुसार २४ तासासाठी परिमाण काढावे).<br><br>क-४) मीटर न बसविता पाणी वापर केल्यास मंजूर परिमाण व २ पट आकारणी करावी.<br><br>-- उपरोक्त दोन्ही दंड ( क-२ व क-३) स्वतंत्रपणे आकारण्यात यावेत.<br><br>क-५) मीटर बंद असल्यास मंजूर परिमाण किंवा लगतच्या कालावधतील वापर यापैकी जे जास्त असेल अशा परिमाणावर व दराच्या २ पट दराने आकारणी करावी. तसेच मीटर सुरु करणेची १ महिन्याची नोटीस द्यावी. या कालावधीत मीटर सुरु न केलेस पाणी पुरवठा बंद करावी. (तरतूद)<br><br>-- मीटर बसविले नसल्यास किंवा १ महिन्यापेक्षा जास्त कालावधीत बंद आढळल्यास १ महिना मुदतीची नोटीस द्यावी व या कालमर्यादेत पूर्तता न झाल्यास पुरवठा बंद करावा.(अभिप्राय)<br><br>औद्योगिक पाणी वापरासाठी आरक्षण केले असल्यास व त्याऐवजी शेती/हिरवळ/वृक्षारोपण वार्षिक मंजूर कोटयातून जास्तीत जास्त १० टक्के पर्यंत किंवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे कमी असेल तेवढया परिमाणासाठी सिंचनाच्या दराने पाणीपट्टी आकारण्यात येईल. परंतु यासाठी शेतीसाठी वापरणा-या पाण्यावर स्वतंत्र मोजमापक बसविण्याची व्यवस्था केली असली पाहिजे. | याबाबतच्या तरतुदी आदेशातील परिशिष्ट-३, परिच्छेद ६.२, ६.३ व ६.४ मध्ये करण्यात आलेल्या आहेत.<br><br>हिरवळीसाठी प्रक्रिया केलेले पाणी वापरणे अभिप्रेत आहे. |
| ६८. | प्रस्तावातील परिच्छेद क्र.२.२. पृ. ३ | **१) प्रस्तावित घरगुती व औद्योगिक वापराच्या जलप्रशुल्काच्या दराबाबत**<br>महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने सध्याचे जलप्रशुल्काचे दर ठरविताना घरगुती व औद्योगिक वापरासाठी त्यावेळच्या एकूण क्षमतेच्या घरगुती व औद्योगिक पाणी मागणीच्या प्रमाणात व घरगुती व औद्योगिक ग्राहकांची देयक अदा करण्याची क्षमता (Affordibility) चा विचार करुन राज्यभरातील जलसंपदा प्रकल्पांची देखभाल दुरुस्तीच्या खर्चातील ५६ टक्के वाटा औद्योगिक व २३ टक्के वाटा घरगुती | म.ज.नि.प्रा. अधिनियम २००५ कलम ११ (घ) मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाने लाभार्थ्यांची व उपभोक्त्यांची मते जाणून घेऊन सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली होण्यासाठी प्राधिकरणाने सन २०१०-१३ चे दरप्रस्तावाचे अनुभवावरुन, या संपूर्ण खर्चाची विभागणी कृषी, घरगुती वापर व औद्योगिक वापर यामध्ये करण्यासाठी वापरकर्त्यांची परवडण्याची क्षमता, |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | ग्राहकांनी सोसावा, या दृष्टीने जलप्रशुल्काचे दर निश्चित केलेले आहेत. आता देखभाल दुरुस्तीच्या अपेक्षित रु. ९११.४४ कोटी खर्चापैकी वाटा उचलण्याचे हेच प्रमाण औद्योगिक वापरासाठी ५९ टक्के व घरगुती वापरासाठी २२ टक्के नुसार जलप्रशुल्काचे दर परिशिष्ट १ नुसार प्रस्तावित केले आहेत. प्रस्तावित दरानुसार औद्योगिक वापरातील (प्रकिये दरम्यान) दरवाढ ३८ टक्के, तर पाणी कच्चा मालाची दरवाढ ५ पट (प्रक्रियेच्या दरवाढीच्या ५ पट)द एकूण २५ पट आहे. तर घरगुती वापरातील दरवाढ १४.३० टक्के आहे. पाणी कच्चामाल वापराच्या दरांमुळे सद्यस्थिती न्यायालयीन दावे सुरु आहेत. आता प्रस्तावित दरवाढीमुळे या वापराच्या ग्राहकांमध्ये अधिकच असंतोष निर्माण होईल.एकूण पाण्याच्या उपलब्धतेतील औद्योगिक वापर फक्त २.१३ टक्के असताना, पाटबंधारे प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी अपेक्षीत रु. ९११.४४ कोटी खर्चातील ५९ टक्के वाटा औद्योगिक वापरातून वसुली संदर्भात पुनर्विचार करुन दरवाढ कमी करण्याची विनंती आहे. | पाण्याची सुलभ उपलब्धता व समयोचितता व वापरकर्त्यांकडून पाण्याचे गुणवत्तेवर होणारे परिणाम या घटकांच्या आधारे संपूर्ण खर्चाची प्रवर्गवार विभागणी केली आहे. याबाबत लाभार्थी व उपभोक्त्यांची मते जाणून घेऊन जून २०१४ मध्ये प्रवर्गवार खर्चाचे निकष अंतिम केलेले आहेत. त्यामुळे ठोक प्रशुल्क निश्चितीकरणाचे या टप्प्यावर सदर सुचनांचा विचार करता येत नाही. |
| ६९. | परिशिष्ट-१, २) मधील क-२). पृ.१५ | **२) घरगुती वापर प्रोत्साहनात्मक व दंडनीय तरतूदी**<br>घरगुती वापराकरिता निरनिराळया महानगरपालिका / ग्रामपंचायती यांचा महामंडळ ठोक प्रमाणात पाणी पुरवठा करते. या संस्थांनी सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट/पुनर्वापर करणे आवश्यक असल्याने महामंडळातर्फे केल्या जाणा-या घरगुती वापराच्या पाण्यावर सांडपाणी प्रक्रिया न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येऊ नये. महामंडळातर्फे बहुतांश ठिकाणी औद्योगिक वापराबरोबर घरगुती वापरासाठी पाणीपुरवठा केला जातो. अशा परिस्थितीत कोणत्याही कारणास्तव पाणीपुरवठा खंडीत करण्याची कारवाई करण्यात येऊ नये. | सूचना विचारात घेऊन याबाबतची तरतूद प्राधिकरणाचे आदेशातील परिशिष्ट-३, परिच्छेद ६.१ व ६.२ मध्ये केली आहे. |
| ७०. | परिशिष्ट-१, ३). पृ. १६ | **३) अन्य विनंती -**<br>१) महामंडळाने ज्या प्रकल्पात भांडवली खर्च अदा केलेला आहे, त्या प्रकल्पात ५ टक्के बांधिलकी शुल्क ( Commitment Charges ) आकारणी करु नये<br>२) बांधिलकी शुल्काच्या पोकळ व दंडनीय आकारणीच्या रकमेवर लोकल | जलाशयातील पाण्याचा इष्टतम वापर करणे अभिप्रेत आहे. यासाठी प्रत्येक वापरकर्त्याने काटेकोर नियोजन करुन आरक्षण करणे अभिप्रेत आहे. वापरकर्त्यास टप्पा नियोजनाची मुभा सुध्दा दिली आहे.<br>अनावश्यक पाणी आरक्षणामुळे पाण्याचा इष्टतम वापर होत नाही या पार्श्वभूमीवर निकषामध्ये ही तरतूद केली आहे. भांडवली खर्च देणा-या संस्थेसाठी |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | सेसची (स्थानिक उपकर) आकारणी करण्यात येऊ नये. | पाणीपट्टी आकारणीचे दर कमी आहेत. या कमी दराच्या ५ टक्के बांधिलकी शुल्क अशा संस्थेला लागू आहे. उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेता या तरतुदीत बदल करण्याची गरज भासत नाही. स्थानिक उपकराबाबतच्या तरतुदी प्राधिकरणाचे कार्यकक्षेबाहेर आहेत. |
| ७१. | परिशिष्ट-१, ३). पृ. १६ | **जलप्रशुल्क प्रस्तावातील संदर्भ** परिशिष्ट १ -घरगुती पाणी वापरासाठीचे दर पृ.क्र.१४ - पाणी पुरवठयाचे स्त्रोतानुसार ग्रामपंचायत, स्थानिक नागरी संस्था ( नगरपालिका/ नगरपरिषदा), महानगरपालिका या तीन उपयोगाकरिता घरगुती ठोक पाणी पुरवठयाचे घनमापन सध्याचे दि. २९/६/२०११ शासन निर्णयानुसारचे मूळ दर व आता प्रस्तावित दराची तुलना खालीलप्रमाणे आहे. सध्या बिगर सिंचनासाठी वर्गवारी नुसार जलप्रशुल्काचे दर रब्बी, खरीप व उन्हाळी हंगामाकरिता वेगवेगळे दर म्हणजे रब्बी हंगामाच्या दराच्या ५० टक्के दर खरीपासाठी व १५० टक्के दर उन्हाळी हंगामासाठी निश्चित केलेले आहेत. <u>परंतु आता वर्गवारीनुसार वर्षभरात सरसकट दर प्रस्तावित आहेत.</u><br>यावरुन असे दिसून येते की, ग्रामपंचायत व नगरपालिकांच्या दरात वाढ नाही. परंतु महानगरपालिकांसाठीच्या दरात १४.३० टक्के वाढ प्रस्तावित आहे. | बिगर सिंचन वापर हा हंगामनिहाय (सिंचनासारखा) बदलत नाही. त्याचप्रमाणे आता प्रत्यक्ष पाणी वापरावर आकारणी दर प्रस्तावित असल्याने हंगामनिहाय दराने क्लिष्टता वाढणार आहे. त्यामुळे आकारणीच्या सुलभतेसाठी खरीप, रबी व उन्हाळी हंगामासाठीचा सरासरी दर संपूर्ण वर्षासाठी प्रस्तावित केला आहे. |
| ७२. | परिशिष्ट-१, २ क-१). पृ. १६ | **जलप्रशुल्क प्रस्तावातील संदर्भ** ब)प्रोत्साहनात्मक तरतुदी पृ.क्र.१४) - महामंडळातर्फे सरासरी १५५० द.ल.लि.प्रदि.पाणी उचल केली जाते वार्षिक सुमारे ५५ टक्के पाणी घरगुती वापराकरिता पुरविले जाते. याची ठळक उदाहरणे खालीलप्रमाणे<br>१)बारवी पाणीपुरवठा योजना. एकूण पाणी उचल ७७० द.ल.ली.प्र.दि.पैकी घरगुती पाणीपुरवठा (वहन व्ययासह)<br>ठाणे महानगरपालिका - १४५ द.ल.ली.प्र.दि.<br>नवी मुंबई महानगरपालिका ७५ दललीप्रदि<br>उल्हासनगर - १५० दललिप्रदि<br>कल्याण डोंबिवली महानगरपालिाका-६०प्रललीप्रदि | सांडपाण्यामुळे जलस्त्रोत दूषित होणे ही समस्या गंभीर होत आहे. म.ज.नि.प्रा. अधिनियम २००५ कलम १२ (५) मध्ये राज्यातील पाण्याचे दर्जात वाढ करण्यासाठी व त्याचे जतन करण्यासाठी " प्रदूषण करणा-यांनी किंमत चुकवावी " हे तत्व वापरण्याची तरतूद आहे. या तरतुदीनुसार तसेच कलम ११ ( घ) नुसार निश्चित केलेल्या निकषानुसारच ही तरतूद आहे. त्यामुळे ही विनंती स्वीकारता येण्यासारखी नाही. तथापि, स्थानिक स्वराज्य संस्थेने सांडपाण्यावर प्रक्रिया न केल्याने म.औ.वि. महामंडळावर दंड आकारणी झाल्यास म.ओ.वि.म. अशी दंडाची रक्कम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून वसूल करु शकेल अशा आशयाची स्पष्टता आदेशातील परिशिष्ट-२, परिच्छेद ५.२ मध्ये करण्यात आली आहे. |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | मिराभाईदंर महानगरपालिका- १०० दललिप्रदि<br>२)तारापूर पाणीपुरवठा योजना : एकूण उचल ७५ द.ल.ली.प्र.दि. पैकी आजूबाजूच्या ग्रामपंचायती ३-द.ल.ली.<br>३)पेण अलिबाग पाणीपुरवठा योजना एकूण उचल ८० द.ल.ली. पैकी आजूबाजूच्या ग्रामपंचायती -३ द.ल.लि.<br>४)पिंपरी चिंचवड पाणीपुरवठा योजना एकूण उचल १२० द.ल.ली. पैकी घरगुती वापर ७० द.ल.ली.प्र.दि. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाण्यावर विहीत वेळेत प्रक्रिया करणे अपेक्षित आहे. **परंतु ती झाल्यास महामंडळावर दंडात्मक कारवाई करण्यात येऊ नये.** | |
| ७३. | परिशिष्ट-१, २ क-१). पृ. १७ | क)दंडनीय तरतुदी - क्र.१(पृ.क्र.१५) - नगरपालिका/ महानगरपालिका/ ग्रामपंचायती यांना प्रती डोई पाणी वापराची मर्यादा ठेवण्यात आली आहे. परंतु ग्रामपंचायती, महानगरपालिकाक, नगरपालिकांना महामंडळातर्फे होणारा पाणी पुरवठा लोसंख्या व त्यानुसार दरडोई पाणी वापर लक्षात घेऊन होत नसून तो त्या त्या संस्थांच्या मागणीनुसार ठोक पध्दतीने करावा लागतो. त्यावेळेस प्रतीडोई मर्यादेवर महामंडळाचे नियंत्रण नसते, त्यामुळे जादा पाणी उचलावे लागल्यास महामंडळावर जादा दराने कारवाई करण्यात येऊ नये तसेच ग्रामपंचायत नगरपालिका/ परिषद/ महानगरपालिका यांना लोकसंख्येनुसार पाणी पुरवठयाची मर्यादा निश्चित करुन देणे उचित होईल, परंतु, स्त्रोतातून पाणी उचलण्याची मर्यादा निश्चित करताना प्रती डोई वापर अधिक काही मर्यादेत System Loss व वहन व्ययाचा अंतर्भाव असावा.<br>महामंडळाशी संबंधित नाही औद्योगिक वापराच्या दंडनीय तरतुदींबाबतच्या अभिप्रायाप्रमाणे औद्योगिक वापराच्या दंडनीय तरतुदींबाबतच्या अभिप्रायाप्रमाणे महामंडळ आरक्षण प्राप्त करताना औद्योगिक व घरगुती कारणासाठी एकत्रीतपणे घेते. अवर्षण काळात पिण्याच्या पाण्याला प्राधान्य असल्याने औद्योगिक वापरावर आपोआपच निर्बंध येतात. अशा परिस्थितीत जलाशयांतील पाण्याची उपलब्धता | घरगुती पाणी वापर मर्यादित करण्यासाठी तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी ही तरतूद निकषामध्ये केली आहे. त्यामुळे ती शिथिल करता येणार नाही. प्राधिकरणाने दिनांक २२ सप्टेंबर २०१७ रोजी " Criteria for Distribution of Surface Water Entitlements by River Basin Agencies for Domestic and Industrial Uses " निर्गमित केलेले आहेत. या निकषातील कलम ६.२ (५) अन्वये सर्व नगरपालिका/महापालिकांना Annual Water Budget सादर करणे बंधनकारक केले आहे. या Water Budget मधील आकडेवारीवरुन वापर विहित मर्यादेपेक्षा जास्त आहे किंवा कसे याची खातरजमा करणे अभिप्रेत आहे. एखादी महापालिका/नगरपालिका म.औ.वि.महामंडाळा व्यतिरिक्त अन्य स्त्रोतातून पाणी घेत असेल व महापालिका/नगरपालिकेचा पाणी वापर अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त असल्यास, जास्त वापर परिमाणास आकारणीचा जादा दर लागू राहील व आकारणीच्या जादा दराने स्त्रोतनिहाय पाणी पुरवठयाच्या प्रमाणात वसूली करणे आवश्यक राहील. |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मसुदा संदर्भ</th><th>प्राप्त अभिप्राय</th><th>मजनिप्राचा प्रतिसाद</th></tr>
<tr><td></td><td></td><td>कमी असल्याने एकूण आरक्षणासाठी आकारणी करण्याऐवजी त्यावर्षी प्रकल्पात पिण्यासाठी त्या-त्या संस्थासाठी राखीव ठेवलेल्या पाण्यासाठी आकारणी करणे रास्त होईल.</td><td></td></tr>
<tr><td>७४.</td><td>प्रस्तावातील परिच्छेद क्र.२.११ पृ. ४</td><td>पृष्ठ क्र.४ : २.१२ (पाणी कच्चामाल) - सध्याचे पाणी कच्चा मालासाठी जल दर प्रक्रिया वापराच्या ५ पट आहेत. आता ही दरवाढ २५ पट प्रस्तावित आहे. पाणी कच्चामाल वापरा अंतर्गत विविध उत्पादने जसे मिनरल वॉटर, शितपेये, आसवनी, ब्रुवरी इत्यादी येतात. या संबंधात मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र. ४२६३ सन २००५ चा निर्णय देताना प्रत्येक प्रकारचे उत्पादनात इतर कारणासाठी पाण्याचा वापर होत असल्यामुळे उत्पादना दरम्यान वापरल्या जाणा-या पाण्यासाठी पाणी कच्चामालाची व इतर कारणासाठी वापरल्या जाणा-या पाण्यासाठी सर्व साधारण औद्योगिक वापराची पाणी आकारावी असे आदेश दिले आहेत. तसेच सदर विषय मा. सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला. या अनुषंगाने पाणी वापराचे प्रमाण ठरविण्यासाठी महामंडळातर्फे नीरी या संस्थेची नेमणूक केली होती. नीरी यांच्या अहवालानुसार पाणी वापर खालीलप्रमाणे आहे :
<table>
<tr><th></th><th>प्रक्रिये दरम्यान</th><th>इतर वापर</th></tr>
<tr><td>मिनरल वॉटर</td><td>८५ %</td><td>१५ %</td></tr>
<tr><td>शितपेये</td><td>८० %</td><td>२० %</td></tr>
<tr><td>आसवनी ब्रुवरी (लिकर, बीअर)</td><td>६५ %</td><td>३५ %</td></tr>
</table>
महामंडळाचे पाण्याचे दर पाणी पुरवठा योजनेवर येणा-या वीज, पाणीपट्टी व इतर वापरासाठी औद्योगिक वापराच्या पाणीपट्टीचे दर विचारात घेऊन वरील प्रकारच्या ग्राहकांचे पाण्याचे दर निश्चित केले आहेत. यावर निरी ने दिलेल्या अहवालानुसार महामंडळाने ठरविलेल्या पाण्याच्या दराबाबत देखील उद्योजकांचे आक्षेप आहेत व मा. सर्वोच्च न्यायालयात दावे दाखल आहेत. पाणी कच्चा माल वापराचे प्रमाण एकूण पाणी वापराच्या तुलनेत अत्यल्प असल्याने महसूलात फार मोठया प्रमाणात</td><td>म.ज.नि.प्रा. अधिनियम २००५ कलम ११ (घ) मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाने लाभार्थ्यांची व उपभोक्त्यांची मते जाणून घेऊन पाणीपट्टी आकारणीचे निकष जून २०१४ मध्येअंतिम केलेले आहेत. त्यामुळे ठोक प्रशुल्क निश्चितीकरणाचे या टप्प्यावर सदर सुचनांचा विचार करता येत नाही.</td></tr>
</table>

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | वाढ अपेक्षीत आहे.<br>न्यायालयीन दाव्यामुळे महामंडळाला सन २०११ पासून पाणी कच्चामाल वापराच्या पाण्याच्या दरात सुधारणा करता आलेली नाही व जर आता २५ पट दरवाढ झाल्यास महामंडळाला नाईलाजास्तव पाण्याचे दर सुधारित करावे लागतील व या दरवाढीमुळे पाणी पुरवठयाच्या थकबाकीत वाढ, नरळजोडणी खंडीत करावी लागणे, न्यायालयीन दाव्यात वाढ इत्यादी घटना संभवतात. त्यामुळे सदर दरवाढीबाबत पुनर्विचार व्हावा अशी विनंती आहे. | |
| ७५. | परिशिष्ट-१, ३ क-१) पृ. १७ | क-१) शासन निर्णय क्र. पापद/२०१५/प्र.क्र.८८/२०१५/(सिं.व्य.(महसूल), दि. २१/०४/२०१६ अन्वये जलसाठा प्रदूषित करणा-या वापरकर्त्यांकडून दंडनीय आकारणी करणेबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. म.औ.वि.महामंडळ जलसंपदा विभागाचा थेट ग्राहक असून, औद्योगिक क्षेत्रातील घटक हे उप ग्राहक होते. सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकानुसार प्रक्रिया करण्याची जबाबदारी उपग्राहकांची आहे त्यामुळे मानकानुसार प्रक्रिया न केल्यास वरील शासन निर्णयानुसारची आकारणी म.औ.वि. महामंडळाऐवजी संबंधित उप ग्राहकाला लागू होणे क्रमप्राप्त आहे. सबब, प्रस्तावित तरतुदीतून महामंडळाला वगळण्यात यावे. | पाण्याचा मुख्य ग्राहक म्हणून म.औ.वि. महामंडळाने उपग्राहक हे सांडपाण्यावर प्रक्रिया करत आहेत याची खातरजमा करणे आवश्यक आहे. अन्यथा अनुज्ञेय दंडनीय आकारणी उपग्राहकाकडून वसूल करुन जलसंपदा विभागाकडे तिचा भरणा करणे अभिप्रेत आहे. याबाबत प्राधिकरणाचे आदेश परिशिष्ट-३, परिच्छेद ६.१ मध्ये तरतूद करण्यात आली आहे. |
| ७६. | परिशिष्ट-१, ३ क-२) पृ.१७ | क-२) महामंडळाला औद्योगिक क्षेत्राव्यतिरिक्त आजूबाजूच्या घरगुती वापराकरिता देखील पाणी पुरवठा करावा लागतो. काळी वेळेस शासनामार्फत/पाटबंधारे विभागामार्फत अथवा जिल्हा अधिका-यांमार्फत मंजुरी बाहेर पाणीपुरवठा करण्याचे महामंडळाला निर्देश प्राप्त होतात व त्यामुळे काही वेळेस मंजुरी बाहेर उचल करावी लागते. अशा परिस्थितीत दंडनीय आकारणी करण्यात येऊ नये. | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम २०११ कलम ११(a) नुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करुन पाणी पुरवठयाचे निकष दिनांक २२ सप्टेंबर २०१७ रोजी निर्गमित केलेले आहेत. या निकषापेक्षा फक्त पाणी देण्याचे आदेश देण्याचा प्रश्न उदभवत नाही आणि असे आदेश / मागणी झाली तरी असा पुरवठा दंडनीय दरानेच करणे अभिप्रेत आहे. |
| ७७. | परिशिष्ट-१, ३ क-३) पृ.१७ | क-३) महामंडळास आरक्षण मंजूर/प्राप्त झाल्यानंतर जलसंपदा विभागाकडे करारनामा मसुदा सादर करण्यात यावा असा करारनामा नुतनीकरण करतेवेळी आरक्षण/मंजुरीत कोणताही बदल नसल्यास फक्त मुदतवाढी व करारनामा | याबाबत शासन स्तरावर निर्णय होणे अपेक्षित. मात्र, म.ज.नि.प्रा. अधिनियम २००५ (२०११ मध्ये सुधारणा केल्यानुसार) कलम १६(क) अन्वये शासनाने पाण्याचे क्षेत्रीय वाटप केल्यानंतर नदीखोरे अभिकरणाकडून प्रवर्गनिहाय पाणी वापराच्या |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | नुतनीकरण करण्यात येतो. या परिस्थितीत नव्याने फक्त सुरक्षा अनामत (वाढीव) अदा करणे व त्या कालावधीसाठी करारनामा करण्यात येतो. काही प्रकरणी, स्थानिक स्तरावर थकबाकी प्रलंबित असणे, आकारणी बाबत आक्षेप असणे व अशा तत्सम बाबीसाठी करारनामा नुतनीकरण करण्यास अडचणी निर्माण होतात, करारनामा प्रलंबित राहतो. यामुळे महामंडळासाठी करारनामा होणे/ नुतनीकरण ही बाब करारनामा मंजुरीसाठी प्रलंबित आहे या सदराखाली दंडनीय आकारणी योग्य नाही, अशी महामंडळाची धारणा आहे. यासाठी कायमस्वरुपी करारनामा करुन, फक्त वाढीव आरक्षण/मुदतवाढ याकरिता पूरक करारनामा करण्यात यावा व तरतुदीतून महामंडळाला वगळण्यात यावे. | हक्काच्या वितरणाचे विहित अटी व शर्तीसह निकष निश्चित करण्याचे अधिकार अधिनियमातील कलम ११(क) नुसार प्राधिकरणास आहेत. त्यामुळे अटी, शर्ती, दंडनीय तरतुदी यांत फरक होऊ शकतो. |
| ७८. | परिशिष्ट-१, ३ क-४) पृ.१७ | क-४) मीटर न बसविता पाणीवापर केल्यास परिणामाऐवजी उदंचकाच्या विसर्गाच्या नोंदीनुसार आकारणी करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. त्यानुसार ऐकेरी दर आकारणी करणे उचित राहील. मात्र बिना मिटरचा कालावधी ३ महिन्यांपेक्षा जास्त नसावा. | मिटर बसविणे अनिवार्य आहे. विनामीटर पाणी पुरवठा अनुज्ञेय नाही. मिटर न बसविता पाणीवापर केल्यास आकारणीबाबतची तरतूद प्राधिकरणाचे आदेश परिशिष्ट-३, परिच्छेद ६.४ मध्ये करण्यात आली आहे. |
| ७९. | परिशिष्ट-१, ३ क-५) पृ.१७ | क-५) मिटर बंद पडल्यानंतर तो काही कारणास्तव लगेचच बदलणे शक्य होत नाही. त्यामुळे मिटर बदलण्यास किमान तीन महिन्यांचा कालावधी देण्यात यावा व या दरम्यान मिटर चालू असतानाच्या लगतच्या कालावधीसाठी सरासरी वापरानुसार किंवा उदंचकाच्या विसर्गाच्या नोंदीनुसार तीन महिने एकेरी दराने आकारणी करण्यात यावी. त्यापुढील कालावधीसाठी मंजूर परिमाणऐवजी लगतच्या कालावधीतील वापरावर दुप्पट दराची आकारणी करणे संयुक्तीक राहील. महामंडळातर्फे बहुतांश ठिकाणी औद्योगिक वापराबरोबर घरगुती वापरासाठी पाणी पुरवठा केला जातो, अशा परिस्थितीत कोणत्याही कारणास्तव पाणीपुरवठा खंडीत करण्याची कारवाई करण्यात येऊ नये. | अंशत: स्विकृत. सूचना विचारात घेऊन सदर कलम सुधारित करण्यात आले आहे. मीटर बंद आढळल्यास ते चालू करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात येईल. सदर कालावधीत मानक दराच्या १.२५ पट दराने आकारणी करण्यात येईल. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन दुरुस्तीसाठी आणखी एक महिन्याची मुदत देण्यात येईल. या वाढीव मुदतीत आकारणी मानक दराच्या १.५ पट दराने करण्यात येईल. मात्र या मुदतीत मीटर सुरु न केल्यास पाणीपुरवठा बंद करण्यात येईल. |
| ८०. | परिशिष्ट-१, ३ ब-१) पृ.१७ | परिशिष्ट १ मधील अ.क्र. (३) (औद्योगिक पाण्याचे दर) मधील (ब-१) पुनर्वापरची मर्यादा किमान ७५ टक्के न ठेवता पुनर्वापर केलेल्या पाण्याच्या परिमाणावर आधारीत प्रोत्साहन असावे. | सदर प्रोत्साहनात्मक तरतुदीचा लाभ घेण्यासाठी किमान २५ टक्के पुनर्वापर अपेक्षित आहे. |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| ८१. | परिशिष्ट-१,३ अ-१) पृ.१७ | ३)अ)सवलतीच्या तरतुदीअंतर्गत अ-१) कृषि उद्योगासाठी देण्यांत येणाऱ्या सवलतीअंतर्गत ऊस प्रक्रिया (ऊस कारखाने) यासाठी सवलत देण्यांत येऊ नये. | सूचना स्विकृत करुन आदेशात आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. |
| ८२. | परिशिष्ट-१,३ ब-१) पृ.१७ | जर एखादा उद्योग, पाण्याचा पुर्नवापर करुन (किमान वापर २५% ने कमी करुन) पुर्नवापराच्या सहाय्याने मागणी किमान ७५%वा त्यापेक्षा कमी करत असेल तर करारनाम्यातील मागणीत झालेली घट, सेवापुरवठादार म्हणजेच कार्यकारी अभियंत्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याने शहानिशा करण्याच्या अटीवर, अनुज्ञेय दराच्या ७५% दर अशा कमी झालेल्या मागणीस आकारण्यांत येईल. | सूचना स्विकृत करुन आदेशात आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. |
| ८३. | परिशिष्ट-१,३ ब-२) पृ.१७ | ३)ब)सवलतीच्या तरतुदीअंतर्गत प्रोत्साहनात्मक तरतुदीअंतर्गत ब-२) मधील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मानकानुसार सांडपाणी शुध्दीकरण करणाऱ्या संस्थाना ५०% दर आकारणी करावी ही बाब वगळण्यांत यावी. याबाबतची कारणमिमांसा खालीलप्रमाणे;<br>सांडपाणी प्रक्रिया करुन शुध्दीकरण केल्याने सदर पाणी वापराचा पर्याय औद्योगिक कंपन्यांना उपलब्ध आहे. त्यामुळे वर ब-१ मध्ये नमुद केल्यानुसार पाणीपट्टी आकारणीमध्ये सवलत मिळू शकेल.<br>सांडपाणी प्रक्रिया न केल्यास ३ पट दराने आकारणी होणार असल्याने सर्व कंपन्यांचा कल शुध्दीकरणाकडे आहे. ३ पट आकारणीऐवजी १ पट दराने आकारणी ही बाब कंपन्यांना प्रोत्साहनात्मक आहे.<br>सदर जल प्रशुल्क प्रस्तावामध्ये मुद्दा क्र.७ मध्ये अपेक्षित पाणीपट्टी वसुली रु.९५१.२४ कोटी इतकी गृहीत धरलेली आहे. यामध्ये औद्योगिक पाणीवापरामुळे होणारी अपेक्षित वसुली रु.५५३.४३ कोटी इतकी आहे.<br>सांडपाणी शुध्दीकरण यंत्रणा अनिवार्य असल्याने व न केल्यास त्यास दंड लागणार असल्याने सर्व कंपन्या सांडपाण्यासाठी यंत्रणा उभारणी करतील त्यामुळे औद्योगिक पाणीवापराची अपेक्षित वसुली ५०% ने कमी होऊन एकूण महसूलात रु.२७६.७० कोटी इतकी घट होईल त्यामुळे अपेक्षित रु.९११.४४ कोटी खर्च | सूचना स्विकृत करुन सदर तरतूद वगळण्यात येत आहे. |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| | | भागविणे शक्य होणार नाही. सदर खर्च भागविण्यासाठी सिंचन,घरगुती पाणीवापर व औद्योगिक पाणीवापराचे दर वाढवावे लागतील. | |
| ८४. | परिशिष्ट-१,३ क-३) पृ.१७ | ३)क) दंडनीय तरतुदी अंतर्गत क-३) मंजुरी असतांना तथापि करारनामा न करता पाणीवापर केल्यास मंजूर परिमाण व १.२५ पट दर आकारणी करावी असे नमुद केले आहे. सदरची तरतुद घरगुती पाणीवापरासाठीच्या दरातील दंडनीय तरतुदीमधील क-४) करारनामा न करता पाणी वापरल्यास १.५० पट दर आकारणी करावी,अशी असावी. | सूचना स्विकृत करुन आदेशातील परिशिष्ट-३, पारिच्छेद ६.३ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. |
| ८५. | नव्याने प्रस्तावित | There is no tariff available in the prevailing GR dated २९/६/२०११ for recycled water. This needs to be considered in proposed revisio. While fixing such rates quality of discharge of treated effluent should be taken into account. (दिनांक २९/९/२०११ च्या शासन निर्णयामध्ये पाण्याच्या पुनर्वापरासाठी प्रक्रियायुक्त पाण्याचे दर उपलब्ध नाहीत. याचा दर सुधारित करताना विचार होणे आवश्यक आहे. अशाप्रकारचे दर ठरविताना प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता विचारात घ्यावी.) | शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय नगर विकास विभागाचा शा.नि. क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२५९/नवि-३३, दि. ३०/११/२०१७ नुसार घेतला आहे. या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचे दराबाबत प्राधिकरणाचे आदेशातील परिच्छेद १० मध्ये तरतूद करण्यात आली आहे. |
| ८६. | परिशिष्ट-१,३ औद्योगिक दर पृ.१६ | The proposal increase of ३८ % in the industrial tariff is very high. It will affect the cost of power generation and increase cost of industrial production. This is to be reviewed.<br><br>औद्योगिक वापरासाठी प्रस्तावित ३८ टक्के दरवाढ फार जास्त आहे. याचा ऊर्जानिर्मिती खर्चावर परिणाम होईल, आणि औद्योगिक उत्पादनाच्या किंमती वाढतील. त्यामुळे याचा पुनर्विचार व्हावा. | म.ज.नि.प्रा. अधिनियम २००५ कलम ११ (घ) मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाने लाभार्थ्यांची व उपभोक्त्यांची मते जाणून घेऊन सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली होण्यासाठी प्राधिकरणाने सन २०१०-१३ चे दरप्रस्तावाचे अनुभवावरुन, या संपूर्ण खर्चाची विभागणी कृषी, घरगुती वापर व औद्योगिक वापर यामध्ये करण्यासाठी वापरकर्त्यांची परवडण्याची क्षमता, पाण्याची सुलभ उपलब्धता व समयोचितता व वापरकर्त्यांकडून पाण्याचे गुणवत्तेवर होणारे परिणाम या घटकांच्या आधारे संपूर्ण खर्चाची प्रवर्गवार विभागणी केली आहे. याबाबत लाभार्थी व उपभोक्त्यांची मते जाणून घेऊन जून २०१४ मध्ये प्रवर्गवार खर्चाचे निकष अंतिम केलेले आहेत. त्यामुळे ठोक प्रशुल्क निश्चितीकरणाचे या टप्प्यावर सदर सुचनांचा विचार करता येत नाही. |

| अ.क्र. | मसुदा संदर्भ | प्राप्त अभिप्राय | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| ८७. | परिशिष्ट-१,३ क-१ ते क-५) पृ.१७ | The penalties proposed for industrial water users are impracticable and very much on higher side, it is to be reviewed<br>औद्योगिक वापरकर्त्यांसाठी प्रस्तावित केलेल्या दंडनीय तरतुदी अव्यवहार्य आहेत आणि (अन्य वापरकर्त्यांचे तुलनेत) जास्त आहेत. याबाबत पुनर्विचार व्हावा. | पुनर्विलोकन करुन तरतुदीत अंशत: बदल करण्यात आला आहे. |
| ८८. | नव्याने प्रस्तावित | ज्या कारखान्यानी प्रदूषित पाण्यावर प्रक्रिया करुन शेतीस पाणी वापर केला आहे अशा पाणी वापरावर शासकीय पाणीपट्टीची आकारणी करु नये<br>. | औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रक्रिया केंद्रावरुन थेट बंदिस्त पाईपव्दारे ( नदीनाल्यात न सोडता) वापर केल्यास अशा पुनर्वापरावर जलसंपदा विभाग पाणीपट्टी आकारणार नाही. मात्र कारखान्यांनी आकारावयाचा पाणीपट्टीचा दर नैसर्गिक पाण्यासाठी निश्चित केलेल्या दराच्या ६० टक्केपेक्षा जास्त नसावा. तसेच अशा प्रक्रिया केलेल्या पाणीवापराचा तपशील जलसंपदा विभागास देणे आवश्यक राहील. |

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY
MWRRA
DOMESTIC • AGRICULTURE • INDUSTRY

## परिशिष्ट - १

### सन २०१७-१९ करिता ठोक जलदर निर्धारणाच्या दरप्रस्तावावर प्राप्त अभिप्रायांचा तपशील

| अ.क्र. | जलक्षेत्रात कार्यरत व्यक्ती / संस्था / तज्ञ |
|---|---|
| १ | श्री. शि.मा. उपासे, निवृत्त प्रधान सचिव, (जसंव्य व लाक्षेवि) जसंवि. |
| २ | श्री. हि.ता. मेंढेगिरी, निवृत्त सचिव, (जसंव्य व लाक्षेवि) जसंवि. |
| ३ | श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स. |
| ४ | प्रा. एन.डी. पाटील, महाराष्ट्र राज्य, इरिगेशन फेडरेशन, कोल्हापूर |
| ५ | डॉ. भारत पाटणकर, कासेगाव, सांगली |
| ६ | श्री. प्रदिप पुरंदरे, निवृत्त प्राध्यापक, वाल्मी, औरंगाबाद |
| ७ | श्री. अप्पू गजानानराव तिडके, शिवसेना, मूर्तिजापूर, जिल्हा अकोला |
| ८ | वसंतदादा सहकारी साखर कारखाना, सांगली |
| ९ | रतन इंडिया नाशिक पॉवर लि. |
| १० | सहयाद्री सहकारी साखर कारखाना, कराड |
| ११ | श्री. पी.एम. देव्हारे, निवृत्त दप्तर कारकून, नाशिक |
| १२ | बापू लाड सहकारी साखर कारखाना, कुंडल, जिल्हा सांगली |
| १३ | नागपूर महानगरपालिका |

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY
MWRRA
DOMESTIC INDUSTRY AGRICULTURE

| संबंधित शासकीय विभाग / महामंडळे / महापालिका | |
|---|---|
| १ | जलसंपदा विभागाचे अभिप्राय |
| २ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अभिप्राय |
| ३ | कार्यकारी संचालक, म.कृ.खो.वि. मंडळ, पुणे |
| ४ | कार्यकारी संचालक, तापी पाविमं, जळगाव |
| ५ | कार्यकारी संचालक, विदर्भ पाविमं व मा. मंत्री, ऊर्जा यांचे अभिप्राय. |
| ६ | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| ७ | मुख्य अभियंता (विप्र), जसंवि, अमरावती |
| ८ | अधिक्षक अभियंता, अकोला सिंचन मंडळ, अकोला |
| ९ | अधिक्षक अभियंता, कडा, नाशिक |
| १० | मुख्य अभियंता, महाराष्ट्र जलसंपत्ती विकास केंद्र, औरंगाबाद |

| अ.क्र. | विविध पाणीवापर सहकारी संस्था |
|---|---|
| १ | बुबनाळ सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या.बुबनाळ. ता.शिरोळ जि.कोल्हापूर |
| २ | बाळासाहेब शहापूरे सह.पाणी पुरवठा संस्था मर्या.बुबनाळ ता.शिरोळ जि.कोल्हापूर |
| ३ | सह्याद्रि सहकारी साखर कारखाना लिमिटेड यशवंतनगर ता.कराड जि.सातारा |
| ४ | कै.आलमखान पठाण कृष्णा सह.पाणी पुरवठा मंडळी लि.आलास ता.शिरोळ जि.कोल्हापूर |
| ५ | संगम सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित , मुंढे ता.कराड जि.सातारा |
| ६ | श्रीराम सहकारी उपसा जलसिंचन संस्था मर्यादित तळबीड ता.कराड जि.सातारा |
| ७ | श्री.बापूसो जमदाडे जय भवानी सह.पाणी पुरवठा संस्था मर्या.माले ता.पन्हाळा जि.कोल्हापूर |
| ८ | करवीर तालुका सह.धरण व पाणी पुरवठा संस्थांचा सह.संघ मर्या.कोल्हापूर जि.कोल्हापूर |
| ९ | सहयाद्रि सहकारी साखर कारखाना लिमिटेड यशवंतनगर ता.कराड जि.सातारा |
| १० | जनसेवा पाणी पुरवठा सेवा सहकारी संस्था मर्या पाडळी खुर्द ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ११ | श्री.नरसिंह सहकारी पाणी पुरवठा सेवा सहकारी संस्था मर्या पाडळी खुर्द ता.करवीर जि.कोल्हापूर |
| १२ | श्री.हनुमान सह.पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या. कुटवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर |
| १३ | तात्यासाहेब कोरे सह.पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.ऐतवडे बुद्रुक ता.वाळवा जि.सांगली. |
| १४ | जांभळी -टाकवडे पंचगंगा सहकारी पाणी पुरवठा मंडळी लि.जांभळी ता.शिरोळ जि.कोल्हापूर |
| १५ | श्री.संभाजी वारणा सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.कोडोली ता.पन्हाळा जि.कोल्हापूर |
| १६ | श्री.महालक्ष्मी सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.कळंबे तर्फ ठाणे कोल्हापूर |
| १७ | श्री अदृश्य काडसिध्देश्वर सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.जैताळ ता.करवीर जि.कोल्हापूर |
| १८ | श्रीदत्त सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.काडोली §कारवे ता.पन्हाळा जि.कोल्हापूर |
| १९ | सहयाद्रि वारणा सह.शेतीर पाणी पुरवठा संस्था मर्या दित कोडोली ता.पन्हाळा जि.कोल्हापूर - |
| २० | श्री.नाईकबा सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.बेलदरे ता.कराड जि. |
| २१ | तमदलगे सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या. तमदलगे ता.शिरोळ जि.कोल्हापूर |

| अ.क्र. | विविध पाणीवापर सहकारी संस्था |
|---|---|
| २२ | श्री.महादेव वारणा सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या. वठार तर्फ उदगांव ता.हातकणंगले जि. |
| २३ | श्री.वारणा शेतकरी सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या. किणी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर |
| २४ | बुवाचे वठार वारणा सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या. वठार तर्फ उदगांव ता.हातकणंगले जि.कोल्हापूर |
| २५ | श्री राम वारणा सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या. वठार तर्फ उदगांव ता.हातकणंगले जि. |
| २६ | श्री सावर्डे § लाटवडे वारणा शेती पाणी पुरवठा मंडळ ता.हातकणंगले जि.कोल्हापूर |
| २७ | करवीर तालुका सह.धरण व पाणी पुरवठा संस्थांचा सह.संघ मर्या.कोल्हापूर जि.कोल्हापूर |
| २८ | श्री.कल्लेश्वर सहकारी पाणी पुरवठा मंडळी लि. शिरोळ ता.शिरोळ जि.कोल्हापूर |
| २९ | श्री.बिरदेव सहकारी पाणी पुरवठा मंडळी लि. अर्जुनवाड. ता.शिरोळ जि.कोल्हापूर |
| ३० | श्री.कोटेश्वर सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.कोर्टी ता.कराड जि.सातारा |
| ३१ | कृष्णाई सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या. पेरले, इंदोली, भूयाचीवाडी ता.कराड जि.सातारा |
| ३२ | श्री.उमेश्वर सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या. उंब्रज ता.कराड जि.सातारा |
| ३३ | श्री.जोतिर्लिंग सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या. चरेगांव ता.कराड जि.सातारा |
| ३४ | श्री सिध्देश्वर सहकारी पाणी पुरवठा मंडळी लि. अर्जुनवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर |
| ३५ | श्री अर्जुनेश्वर सहकारी पाणी पुरवठा मंडळी लि. अर्जुनवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर |
| ३६ | तुपारी दहयारी घोगांव गणेशवाडी सह. पाणी पुरवठा संस्था मर्या.कुंडल ता.पलुस जि.सांगली. |
| ३७ | श्रीदत्त सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या. हरेवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर |
| ३८ | श्रीदत्त वारणा सह.पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या .करंजवडे.वाळवा जि.सांगली. |
| ३९ | वसंत पाणी पुरवठा मंडळ कसबे डिग्रज स्कीम नं.२ ता.मिरज जि.सांगली. |
| ४० | वैभव जलसिंचन क \|\| कसबे डिग्रज स्कीम नं. ता.मिरज जि.सांगली. |
| ४१ | सहकारी पाणी पुरवठा मंडळ मर्यादित कसबे डिग्रज स्कीम नं. ता.मिरज जि.सांगली. |
| ४२ | श्री.हनुमान सहकारी पाणी पुरवठा मंडळी लि.कांडगाव ता.करवीर जि.कोल्हापूर |

| अ.क्र. | विविध पाणीवापर सहकारी संस्था |
|---|---|
| ४३ | श्री.मसाईदेवी सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या.पोर्ले तर्फ ठाणे ता.पन्हाळा जि.कोल्हापूर |
| ४४ | जीवन परस्पर सहाय्यक मंडळ कसबे डिग्रज स्कीम नं.३ ता.मिरज जि.सांगली. |
| ४५ | श्री.भाग्यलक्ष्मी सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित कसबे डिग्रज ता.मिरज जि.सांगली. |
| ४६ | यशवंतराव अतिग्रे सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्या.कोगे ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ४७ | भोगावती सहकारी पाणी पुरवठा मंडळी लिमिटेड दोनवडे ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ४८ | श्री.हनुमान सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित हळदी ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ४९ | डॉ.पतंगराव कदम यशवंत सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित पलूस ता.पलूस जि.सांगली |
| ५० | श्री.हनुमान सहकारी पाणी पुरवठा संस्था आसुर्ले पोस्ट पोर्ले ता.पन्हाळा जि.कोल्हापूर |
| ५१ | रत्नसागर सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित अर्जुनवाड ता.शिरोळ जि.कोल्हापूर |
| ५२ | क्रांती उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्या. कुंडळ बलवडी ,आंधळी, पलूस ता.पलूस जि.सांगली |
| ५३ | महालक्ष्मी वारणा सह.पाणी पुरवठा संस्था मर्या. कुरळप ता.वाळवा जि.सांगली |
| ५४ | श्री.राम सहकारी पाणी पुरवठा संस्था मयादित मडिलगे बु.\|\|ता.भुदरगड जि.कोल्हापूर |
| ५५ | पंचगंगा सह.पाणी पुरवठा मंडळी लि.वडणगे §निगवे दु \|\|ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ५६ | वैभव सहकारी पाणी पुरवठा संस्था लि.बोरगांव ता.वाळवा जि.पुणे. |
| ५७ | श्री.शिवाजी सह.पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.दुधोंडी पं.२ ता.पलूस जि.सांगली. |
| ५८ | श्री.एक विरादेवी सह.पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या. देवाळे ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ५९ | श्री. भाग्यलक्ष्मी सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या. आरेवाडी गमेवाडी ता.कराड जि.सातारा |
| ६० | आदरणीय पी.डी.पाटीलसाहेब सहकारी पाणी पहुरवठा मंडळी लि. कराड जि.सातारा . |
| ६१ | जयंत सह.पाणी पुरवठा संस्था मर्यादित, बहादुरवाडी ता.वाळवा जि.सांगली |
| ६२ | सिध्दराज सह. शेती पाणी पुरवठा संस्था नं.१ मर्यादित, कवठे एकंद ता.तासगांव जि.सांगली |
| ६३ | शिवदत्रापती सह. पाणी पुरवठा संस्था मर्यादित, बोरगांव ता.वाळवा जि.सांगली |

| अ.क्र. | विविध पाणीवापर सहकारी संस्था |
|---|---|
| ६४ | पाच आंबा सह. पाणी पुरवठा संस्था मर्यादित, आष्टा ता.वाळवा जि.सांगली |
| ६५ | महालक्ष्मी सह. पाणी पुरवठा संस्था मर्यादित, आष्टा ता.वाळवा जि.सांगली |
| ६६ | बसवेश्वर सह. पाणी पुरवठा संस्था मर्यादित, इस्पूर्ली ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ६७ | नाम विनयरावजी कोरे वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, अंबप ता.हातकणगले जि.कोल्हापूर |
| ६८ | गुरुवर्य लालासाहेब पाटील सह. पाणी पुरवठा संस्था लि. वाळवा ता.वाळवा जि.सांगली |
| ६९ | राजाराम बापू सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. वाळवा नं.१ ता.वाळवा जि.सांगली |
| ७० | वाळवा सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. वाळवा नं.२ ता.वाळवा जि.सांगली |
| ७१ | श्री.शिवाजी सेवा सहकारी जलसिंचन योजना मर्यादित दुधोंडी नं.१ ता.पलूस जि.सांगली |
| ७२ | वाळवा सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. वाळवा नं.१ ता.वाळवा जि.सांगली |
| ७३ | कामेरी, येडेनिपाणी सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. कामेरी ता.वाळवा जि.सांगली |
| ७४ | नागांव सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. नागांव ता.वाळवा जि.सांगली |
| ७५ | राजाराम बापू सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. भडकंबे ता.वाळवा जि.सांगली |
| ७६ | श्री.बिरदेव सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. नागांव ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ७७ | श्री.हनुमान सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. इस्पूली ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ७८ | श्री.जोर्तिलिंग सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. वडकशिवाले ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ७९ | श्री.हरहर महादेव सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. आनंदनगर चुये ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ८० | बावसची सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. बावची ता.वाळवा जि.सांगली |
| ८१ | श्री.बिरदेव सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. वाशी ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ८२ | श्री.भैरवनाथ सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. आष्टा ता.वाळवा जि.सांगली |
| ८३ | उरुण इस्लामपूर सह. पाणी पुरवठा संस्था लिमिटेड ता.वाळवा जि.सांगली |
| ८४ | राजाराम बापू सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. डोंगरवाडी ता.वाळवा जि.सांगली |

| अ.क्र. | विविध पाणीवापर सहकारी संस्था |
|---|---|
| ८५ | श्री.भैरवनाथ सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. गाताडवाडी ता.वाळवा जि.सांगली |
| ८६ | येलूर सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. येलूर ता.वाळवा जि.सांगली |
| ८७ | श्री. गणेश सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. आष्टा ता.वाळवा जि.सांगली |
| ८८ | अनंत सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. बागणी ता.वाळवा जि.सांगली |
| ८९ | वशी, लाडेगांव ,जक्राईवाडी सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. वशी ता.वाळवा जि.सांगली |
| ९० | श्री.हनुमान सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. कुरळप ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ९१ | गजानन सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. बोरगांव ता.करवीर जि.कोल्हापूर |
| ९२ | श्री.विठठल सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. देवर्डे ता.वाळवा जि.सांगली |
| ९३ | श्री.भैरवनाथ सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. कासेगोव ता.वाळवा जि.सांगली |
| ९४ | राजाराम बापू सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. शिगांव ता.वाळवा जि.सांगली |
| ९५ | पांढरमळा सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. बागणी ता.वाळवा जि.सांगली |
| ९६ | वैभव सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. बोरगांव ता.वाळवा जि.सांगली |
| ९७ | वाटेगांव संयुक्त सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. वाटेगांव ता.वाळवा जि.सांगली |
| ९८ | वाटेश्वर सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. वाटेगांव ता.वाळवा जि.सांगली |
| ९९ | इटकरे सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. इटकरे ता.वाळवा जि.सांगली |
| १०० | राजाराम बापू सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. मालेवाडी ता.वाळवा जि.सांगली |
| १०१ | श्री.नागनाथ सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. अंबप ता.हातकणंगले जि.कोल्हापूर |
| १०२ | श्री.केदारलिंग सह. पाणी पुरवठा सोसायटी लि.वाकरे ता.करवीर जि.कोल्हापूर |
| १०३ | बारामती तालुका सह.दुध उत्पादक संघ मर्या. बारामती ता.बारामती जि.पुणे |
| १०४ | श्री.जोर्तिलिंग सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. कुंडू ता.करवीर जि.कोल्हापूर |
| १०५ | डॉ.जे.सी.पाटील कान्होबा वारणा सह. पाणी पुरवठा संस्था मर्या.कणेगांव ता.वाळवा जि.सांगली |

| अ.क्र. | विविध पाणीवापर सहकारी संस्था |
|---|---|
| १०६ | श्री.खंडेराया सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. मोहरे ता.पन्हाळा जि.कोल्हापूर |
| १०७ | नागांव वि.का.स सेवा संस्था मर्यादित नागांव ता.हातकणंगगले जि.कोल्हापूर |
| १०८ | जय जवान जय किसान वारणा सह.पाणी पुरवठा मर्या. तांदुळवाडी ता.वाळवा जि.सांगली |
| १०९ | श्री.हनुमान वारणा सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या. तांदुळवाडी ता.वाळवा जि.सांगली |
| ११० | श्री. तांदळेश्वर वारणा सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या. तांदुळवाडी ता. वाळवा जि. सांगली |
| १११ | श्री. महालक्ष्मी वारणा सह. पाणी पुरवाठा संस्था. मर्या. पेठ वडगाव ता.हातकणंगले जि. कोल्हापुर |
| ११२ | वाघाड प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्था मोहाडी ता. दिंडोरी जि. नाशिक |
| ११३ | श्री. भगवतसिंग वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, आरळे तर. पन्हाळा जि. कोल्हापुर |
| ११४ | श्री.हनुमान वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, भादोले ता. हातकणंगले जि. कोल्हापुर |
| ११५ | श्री. गणेश वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या. चिकुर्डे ता. वाळवा जिल्हा - सांगली |
| ११६ | टोल वडगाव तासगाव § मिणचे सह. पाणी पुरवठा संस्था मर्या. पेठ वडगांव ता. हातकणंगले जि. कोल्हापुर |
| ११७ | अंबप, तळसंदे वारण सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, तळसंदे ता. हातकणंगले जि. कोल्हापुर |
| ११८ | तळसंदे वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या. तळसंदे ता. हातकणंगले जि. कोल्हापुर |
| ११९ | तळसंदे पारगाव सहकारी पाणी पुरवठा मंडळ लि. तळसंदे ता. हातकणंगले जि. कोल्हापुर |
| १२० | श्री. राम वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, भादोले ता.हातकणंगले जि. कोल्हापुर |
| १२१ | श्री. रावसो भाऊसो पाटील वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या, भादोले ता. हातकणंगले, जि. कोल्हापुर |
| १२२ | श्री. जोतिर्लिंग वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, भादोले ता. हातकणंगले, जि. कोल्हापुर |
| १२३ | जयभवानी वारणा सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या., कुंडलवाडी ता. वाळवा जि. सांगली |
| १२४ | १० पाणीवापर संस्थांचा अर्ज |
| १२५ | कोल्हापूर जिल्हा पावा सहकारी संघ |